सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २३ जुलै २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १११ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेले- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## महाराष्ट्र नायक कॉफी टेबल बुकचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

मुंबई, दि. २२ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्य प्रेरणादायी असून त्यांनी महाराष्ट्राला अल्पावधीत प्रगतीपथावर नेले, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाटचालीचा वेध घेणाऱ्या 'महाराष्ट्र नायक' या विशेष कॉफी टेबल बुकचे प्रकाशन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे हस्ते राजभवन येथे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांची कॉफी टेबल बुकची निर्मितीची संकल्पना



अभिनंदनीय असल्याचेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार कालिदास कोळंबकर, योगेश सागर, मंगेश चव्हाण, देवयानी फरांदे, अनुप अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात 'जलयुक्त शिवार अभियान' योजना राबवण्यात आली, ज्यामुळे २२,००० हून अधिक गावांमध्ये जलसुरक्षा प्राप्त झाली. तसेच, नागपूर-मुंबई शहरांना जोडणारा 'समृद्धी महामार्ग' हा भविष्यकालीन दृष्टीकोन असलेला प्रकल्प साकारला गेला. महाराष्ट्राने सेवा हक्क कायदा लागू केला आहे.त्यामुळेच 'आपले सरकार' ही तक्रार निवारण प्रणाली आणि सेवा हक्क कायदा नागरिकांना शेकडो सेवा घरपोच देत आहे, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, श्री.फडणवीस यांच्या गतिशील नेतृत्वाखाली, महाराष्ट्र २०१६ मध्ये देशात सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक (ऋऊख) आकर्षित करणारे राज्य ठरले, जे देशाच्या एकूण गुंतवणुकीच्या जवळपास निम्मे होते. पायाभूत सुविधा क्षेत्रातील प्राधान्यामुळे मुंबई मेट्रोचे विस्तार प्रकल्प, 'अटल सेतू' सागरी पूल, तसेच शासकीय-खासगी भागीदारीद्वारे शहरी व ग्रामीण विकासाला चालना मिळाली. राज्यात सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने 'ग्रामीण सामाजिक परिवर्तन अभियान' आणि दुर्बल घटकांसाठी सीएसआरअंतर्गत प्रभावी उपक्रम राबवण्यात आले. महाराष्ट्रात लवकरच वाढवणमधील खोल समुद्रातील बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जपान सरकारच्या साहाय्याने सुरू असलेली बुलेट ट्रेन योजना हे तीन ऐतिहासिक प्रकल्प साकारले जाणार असल्याचेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

# राज्यातील शेतकऱ्यांसाठी २५ हजार कोटींची कृषीसमृद्ध योजना जाहीर

नाशिक : शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करतानाच हवामान अनुकूल, शाश्वत आणि किफायतशीर शेतीला प्रोत्साहन देत शेती उत्पन्नात वाढ करून शेतकऱ्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने समृद्धी आणण्याच्या प्रमुख उद्देशाने राज्य सरकारने नव्या योजनेच्या अंमलबजावणीची घोषणा केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसादिनी राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी ही 'कृषीसमृद्ध' भेट असल्याचे राज्याचे कृषीमंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी जाहीर केले. त्यांनी नाशिक येथे माध्यमांशी संवाद साधला.



महाराष्ट्रातील शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा घटक आहे. राज्याच्या कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्याकरीता अर्थसहाय्य करण्यासाठी कृषी विभागामार्फत नव्यानेच योजना जाहिर करण्यात आली आहे. कृषी समृद्धी योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्यास, त्यानुसार सन २०२५-२६ पासून पुढील पाच वर्षांमध्ये दरवर्षी रु. पाच हजार कोटी अशी एकूण रु. २५ हजार कोटींची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, पीक विविधीकरण करणे, मूल्य साखळी बळकट करणे, तसेच हवामान अनुकूल आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, हा कृषी समृद्धी योजनेचा मुख्य उद्देश आहे. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी समृद्धी योजनेमुळे माझ्या शेतकरी बांधव-भगिनींच्या जीवनात खऱ्या अर्थाने समृद्धी येईल, असा विश्वास कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केला आहे.

# दिल्ली येथे परिसंवादात सहभागी होणार सरसंघचालक, आगामी २६ ते २८ ऑगस्टदरम्यान होणार आयोजन

नवी दिल्ली, २२ जुलै : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत २६ ते २८ ऑगस्ट दरम्यान दिल्लीच्या विज्ञान भवनात आयोजित परिसंवादाला संबोधित करतील. संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत संघाचे दिल्ली प्रांत संघचालक डॉ. अनिल अग्रवाल यांनी सांगितले की आगामी २६, २७ व २८ ऑगस्ट रोजी रोज संध्याकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत परिसंवादात मार्गदर्शन करतील. या परिसंवादासाठी देश-विदेशातील प्रतिष्ठित व्यक्तींना निमंत्रण देण्यासाठी यादी तयार केली जात आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, यापूर्वी २०१७ मध्ये १६ ते १८ सप्टेंबर दरम्यान दिल्लीतील याच विज्ञान भवनात डॉ. भागवत यांनी तीन दिवसीय अशाच प्रकारच्या परिसंवादात सहभाग घेतला होता. संघाच्या इतिहासात अशा स्वरूपाचा तो पहिलाच कार्यक्रम होता. त्या वेळी ६० पेक्षा अधिक देशांचे दिल्लीस्थित राजदूत किंवा उच्चायुक्त, सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, विविध संस्थांचे प्रमुख आणि चित्रपटसृष्टीतील मान्यवर यांना आमंत्रित करण्यात आले होते.

त्या कार्यक्रमात डॉ. भागवत यांनी संघाची स्थापना, उद्दिष्टे व कार्यपद्धती याविषयी स्पष्ट आणि थेट भाष्य केले होते. तसेच संघाविषयी असलेल्या काही गैरसमज दूर करण्याचाही प्रयत्न केला होता. अंतिम दिवशी काही प्रमुख मान्यवरांच्या प्रश्नांना उत्तरही दिली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात १९२५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे यंदा शताब्दी वर्ष आहे. या वर्षीच्या विजयादशमीपासून पुढील वर्षीच्या विजयादशमीपर्यंत संघ विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून व्यापक जनसंपर्क साधण्याच्या तयारीत आहे.

# मुंबई बॉम्बस्फोट : १२ आरोपींच्या सुटकेवर सुप्रीम कोर्टात २४ जुलैला सुनावणी!

मुंबई: मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय लोकल गाड्यांमध्ये ११ जुलै २००६ रोजी घडवण्यात आलेल्या साखळी बॉम्बस्फोटांसंबंधित सर्वच्या सर्व १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. हा निकाल धक्कादायक असून महाराष्ट्र सरकार या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होतं. त्यानुसार आता या निकालाला राज्य सरकारद्वारे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं आहे. या प्रकरणी आता पुढील सुनावणी २४ जुलै रोजी होणार आहे.

मुंबई लोकल साखळी बॉम्बस्फोटाप्रकरणी सत्र न्यायालयाने १२ पैकी पाच आरोपींना फाशीची शिक्षा, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र मुंबई उच्च न्यायालयाने काल या सर्व आरोपींबाबतचा सत्र न्यायालयाचा निकाल रद्द करून त्यांची तातडीने सुटका करण्याचे आदेश दिले. मात्र आता या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणी आता सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

१२ आरोपींना सोडून देण्याचा निर्णय

२००६ मध्ये मुंबईतल्या लोकल ट्रेनमध्ये साखळी बॉम्बस्फोट झाले. यातल्या १२ आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी मुक्त करण्याचा निर्णय दिला. या आरोपींपैकी कमाल अन्सारीचा २०२१ मध्ये मृत्यू झाला. त्यानंतर उर्वरित आरोपींना सोडण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला. साखळी स्फोट घडवण्यासाठी कोणत्या प्रकारच्या बॉम्बचा वापर केला गेला, याचीच माहिती तपास यंत्रणेने सादर केली नसल्याचे न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने निकालात अधोरेखित केले. तसेच, स्फोटके, नकाशे आणि बंदुका हे पुरावे आरोप सिद्ध करण्यास पुरेसे नसल्याची टिप्पणीही न्यायालयाने केली. त्यानंतर या आरोपींची मुक्तता करण्यात आली. दरम्यान या निर्णयाला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे.

१९ वर्षांपासून कैदेत

विशेष न्यायालयाने या प्रकरणी १३ आरोपींवर खटला चालवला होता. त्यात कमाल अन्सारी (आता मृत), मोहम्मद फैझल अत्तार रहमान शेख, एहतेशाम कुतुबुद्दीन सिद्दिकी, नाविद हुसेन खान आणि आसिफ खान यांना विशेष न्यायालयाने बॉम्ब ठेवल्याच्या मुख्य आरोपांसह अन्य आरोपांत दोषी ठरवून फाशीची शिक्षा सुनावली होती. तर, तन्वीर अहमद मोहम्मद इब्राहिम अन्सारी, मोहम्मद माजिद मोहम्मद शफी, शेख मोहम्मद अली आलम शेख, मोहम्मद साजिद मार्गुब अन्सारी, मुझम्मिल अतौर रहमान शेख, सुहेल मेहमूद शेख आणि जमीर अहमद लतीउर रहमान शेख यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. वाहिद शेख याला न्यायालयाने निर्दोष ठरवले होते. गेल्या १९ वर्षांपासून कैदेत असलेल्या सर्व आरोपींची जामिनावर तातडीने सुटका करण्याचे आदेश न्यायमूर्ती किलोर आणि न्यायमूर्ती चांडक यांच्या खंडपीठाने दिले.

# कोकाटे यांच्या अंगावर पत्ते उधळण्याचा उबाठा गटाकडून प्रयत्न, तीन कार्यकर्ते पोलिसांच्या ताब्यात

नाशिक: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आज नाशिकमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात कृषीमंत्री माणिकराव कोकाटे जात असताना, उबाठा गटाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होऊन त्यांच्या ताफ्यावर पत्ते उधळण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत संबंधित कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळतानाचा व्हिडिओ गेल्या दोन दिवसांपासून सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यावर विरोधकांकडून चांगलेच तोंडसुख घेतले जात असून, त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. आज सकाळी नाशिक रोड येथील अनुराधा चौकात आयोजित कार्यक्रमात कोकाटे जात असताना त्यांच्या ताफ्यावर पत्ते उधळण्याचा प्रयत्न करण्यात आला. या निषेधात्मक कृतीत उबाठाचे उपजिल्हाप्रमुख भैया मणियार, योगेश देशमुख आणि निलेश शिरसाठ यांनी सहभाग घेतला होता. या तिघांनी कृषी मंत्री कोकाटे यांना निवेदन देण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याच वेळी त्यांनी कोकाटे यांच्या अंगावर पत्ते उधळण्याचा प्रयत्न करून वातावरण तापवले. दरम्यान पोलिसांनी तत्काळ तिथे येऊन या तिघांना ताब्यात घेतले.

सदर प्रकरण आणखीन चिघळू नये तसेच, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# आयसीआयसीआय बँकेच्या माजी सीईओ चंदा कोचर लाचखोरी प्रकरणात दोषी

## ३०० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यासाठी ६४ कोटींच्या लाचखोरी प्रकरणात दोषी

नवी दिल्ली: आयसीआयसीआय बँकेच्या माजी मुख्य कार्यकारी अधिकारी चंदा कोचर लाचखोरी प्रकरणात दोषी ठरल्या आहेत. नवी दिल्लीतील अपीलेट ट्रिब्युनलने दिलेल्या निर्णयात त्यांना व्हिडियोकॉन ग्रुपला ३०० कोटींचे कर्ज मंजूर करताना ६४ कोटींची लाच घेतल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे.

अंमलबजावणी संचालनालय (ईडी) च्या तपासाला दुजोरा देत ट्रिब्युनलने सांगितले की, चंदा कोचर यांनी पदाचा गैरवापर करत व्हिडियोकॉन समूहाला कर्ज मंजूर केलं आणि त्याच्याच दुसऱ्या कंपनीमार्फत दुसऱ्या दिवशी त्यांच्या पतीच्या कंपनीला ६४ कोटी ट्रान्सफर करण्यात आले.



व्हिडियोकॉनची 'सुप्रीम एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड' ही कंपनी आणि कोचर यांच्या पती दीपक कोचर यांची 'नूपॉवर रिन्युएबल्स' यांच्यात झालेली रक्कम अदलाबदल ही स्पष्ट लाच असल्याचं ट्रिब्युनलने ठामपणे म्हटलं.

मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्यातील (पीएमएलए) कलम ५० अंतर्गत नोंदवलेले जबाब वैध मानत ट्रिब्युनलने म्हटले की, लाचखोरीचे पुरावे ठोस असून कुठलीही शंका उरत नाही.

२०२० मध्ये, एका प्राधिकरणाने चंदा कोचर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या ७८ कोटी रुपयांच्या मालमत्तेची जप्ती चुकीची ठरवली होती. मात्र, आता अपीलीय न्यायाधिकरणाने त्या प्राधिकरणाच्या निर्णयालाही चुकीचे म्हटले आहे. न्यायाधिकरणाने स्पष्ट केले की, त्या प्राधिकरणाने आवश्यक पुराव्यांकडे दुर्लक्ष केले आणि चुकीचा निष्कर्ष काढला. ईडीने सबळ पुरावे आणि घटनांच्या स्पष्ट वेळापत्रकाच्या आधारे मालमत्ता जप्त केली होती. काही दिवसातच ६४ कोटी नूपॉवरकडे वळवण्यात आले. याच आधारे ट्रिब्युनलने २०२० च्या त्या निर्णयावर टीका केली, ज्यामध्ये कोचर दाम्पत्याला क्लीन चिट देण्यात आली होती. कर्ज देणे, पैसे हस्तांतरित करणे आणि दीपक कोचर यांच्या कंपनीला निधी पाठवणे हे सर्व चंदा कोचर यांनी सत्तेचा गैरवापर आणि नैतिकतेचे उल्लंघन दर्शवते, असे ट्रिब्युनलने म्हटले आहे. या निर्णयामुळे चंदा कोचर यांच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# दिल्लीत एअर इंडियाच्या विमानाला आग

नवी दिल्ली : हाँगकाँगहून दिल्लीला येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला मंगळवारी दिल्लीच्या इंदिरा गांधी विमानतळावर उतरताच आग लागली. यामुळे विमानाचे थोडे नुकसान झाले. सुदैवाने सर्व प्रवासी, क्रू आणि वैमानिक सुरक्षित आहेत.




हाँगकाँग - दिल्ली विमान क्रमांक एआय ३१५ दिल्ली विमानतळावर उतरले. विमान उतरले आणि एका सहाय्यक इलेक्ट्रिक युनिट (एपीयू) मध्ये आग लागली. प्रवासी विमानातून उतरत असताना ही घटना घडली. सिस्टम डिझाइननुसार एपीयू आपोआप बंद झाले. पुढील तपासाकरिता आग विझवून विमान विमानतळावर एका बाजूस सुरक्षित ठेवले आहे. तज्ज्ञ तपासणी करुन आग लागण्याचे कारण शोधत आहेत. एअर इंडियाने घटनेची माहिती दिल्ली विमानतळ प्रशासनाला तसेच नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाला दिली आहे.

# राजीनामा देण्यासारखं मी काय केलं ते सांगा: कृषिमंत्री माणिकराव कोकाटे

नाशिक: विधिमंडळाचं कामकाज सुरु असताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा ऑनलाईन रमी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी घडून गेल्या. विरोधकांनी कृषिमंत्र्यांच्या या कृतीवर चांगलेच तोंडसुख घेतले, इतकेच नव्हे तर हे प्रकरण इतके वाढले कि त्याचे पडसाद लातूर बंद पर्यंत पोहोचले. या सर्व कारणांमुळे माणिकराव कोकाटे (चरपळझीरे घेझरींश) हे आपल्या पदाचा राजीनामा देतील, अशी जोरदार चर्चा होती. मात्र, या चर्चेला माणिकराव कोकाटे यांनी नाशिक येथे पत्रकार परिषद घेत पूर्णविराम लावला आहे. या पत्रकार परिषदेत माणिकराव कोकाटे यांनी आपली बाजू स्पष्ट करताना पत्रकारांच्या अनेक प्रश्नांना सडेतोड उत्तरं दिली. मला रमी खेळताच येत नाही असे सांगत विनाकारण माझी बदनामी सुरु असल्याचे पुढे सांगितले. तसेच जर मी दोषी आढळलोच तर नागपूर अधिवेशनात राजीनामा देईल असे देखील त्यांनी जाहीर केले आहे.

माणिकराव कोकाटे यांची पत्रकार परिषद

माणिकराव कोकाटे यांनी आज (२२ जुलै) नाशिकमध्ये पत्रकार परिषद घेतली. यावेळी माणिकराव कोकाटे यांनी राजीनाम्याच्या घोषणेऐवजी कृषी विभागाच्या एका नव्या योजनेची घोषणा केली. माणिकराव कोकाटे यांनी कृषी समृद्धी या नव्या योजनेचे लॉंचिंग करत असल्याचे जाहीर केले. शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये पाच हजार कोटींची भांडवली गुंतवणूक करण्याला मंत्रिमंडळाने मान्यता दिली होती. मात्र, त्याचा जीआर निघणे बाकी होते, तो आज निघाला, असे माणिकराव कोकाटे यांनी सांगितले. यानंतर माणिकराव कोकाटे यांनी त्यांच्या राजीनाम्याच्या चर्चेसंदर्भात भाष्य केले. यावेळी त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला.

मी एक रुपयाची रमी खेळलेली नाही

कोकाटे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला आहे. राजीनामा देणार का या पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना माणिकराव कोकाटे म्हणाले, खरं म्हणजे हा इतका छोटा विषय आहे, तो इतका लांबला का ते माहिती नाही. ऑनलाईन रमी हा प्रकार तुम्हाला माहिती नाही का, तो खेळण्यासाठी त्याला मोबाईल नंबर आणि बँक अकाऊंट जोडावा लागतो. माझा असा कोणताही मोबाईल नंबर आणि बँक अकाऊंट ऑनलाईन रमीच्या ॲप्लिकेशनला जोडलेला नाही. कुठेही चौकशी करा, ज्या दिवसापासून ऑनलाईन रमी सुरु झाली आहे, तेव्हापासून मी एक रुपयाची रमी खेळलेली नाही. किंबहुना मला रमी खेळताच येत नाही. त्यामुळे माझ्यावरील आरोप बिनबुडाचा आहे. यामुळे माझी महाराष्ट्रात बदनामी झाली आहे. कारण नसताना ऑनलाईन रमीचा जो आरोप केला आहे, ज्या राजकीय नेत्यांनी आरोप केला आहे, ज्यांनी माझी बदनामी केली आहे, त्यांना कोर्टात खेचल्याशिवाय मी राहणार नाही, असा इशारा माणिकराव कोकाटे यांनी दिला.

गेम स्कीप केल्याचा व्हिडिओ तुमच्यापर्यंत आलाच नाही

मी त्यादिवशी सभागृहात होतो, माझं काम होतं. मला माझ्या ओएसडीकडून माहिती हवी असेल तर मला एसएमएस किंवा फोन करावा लागतो. त्यांना सभागृहात येता येत नाही. त्यासाठी मी एक मोबाईल मागवला होता. मोबाईल उघडल्यावर त्याच्यावर तो गेम आला, त्या गेमचा सारखा पॉप-अप येतो. तो मला स्कीप करता आला नाही. तो मोबाईल माझ्यासाठी नवीन होता म्हणून मला गेम स्कीप करायला वेळ लागला. पण मी गेम स्कीप केल्याचा व्हिडिओ तुमच्यापर्यंत आलाच नाही, तो तुम्ही दाखवलाच नाही. मोबाईलवर एकच गेम येत नाही, वेगवेगळे गेम येतात. ३० सेकंद गेम स्कीप करता येत नाही. माझा व्हिडिओ ११ सेकंदांचा आहे. त्यावरुन आरोप-प्रत्यारोप सुरु झाले.

त्या क्षणाला न थांबता राजीनामा देईन

पूर्ण व्हिडीओ दाखवला असता तर माझ्यावरील आरोपांमध्ये काहीही तथ्य नाही, हे स्पष्ट झाले असते. मी आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सभापती आणि विधानसभा अध्यक्षांना लेखी पत्र देणार आहे, याप्रकरणाची सखोल चौकशी होण्याची गरज आहे. त्यामुळे माझ्या पत्राच्या आधारे तुम्ही चौकशी करावी. मी ऑनलाईन रमी खेळत असेन, मी दोषी सापडलो तर नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांपैकी कोणीही निवेदन करावं, त्या क्षणाला न थांबता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्याला न भेटता मी राज्यपालांकडे जाऊन माझा राजीनामा देईन, असे माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

या सर्वांच्या पाठीमागचा सूत्रधार कोण, हे शोधण्यासाठी चौकशी करावी

माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले की, तो व्हिडिओ कोणी काढला त्याच्या खोलात मला जायचं नाही. परंतु, त्यामध्ये एवढं विशेष काही नव्हतं की, ज्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या भावना दुखावतील किंवा छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या भावना दुखावतील. मी काहीही वेडवाकडं केलेलं नाही. मी आतापर्यंत शेतकऱ्यांसाठी इतके निर्णय घेतले, त्यासंदर्भात आतापर्यंत कोणीही काहीच बोललं नाही. फक्त ज्याचा शेतकऱ्यांशी संपर्क नाही, अशा गोष्टी फक्त मीडियात दाखवल्या गेल्या. दोषी असलेल्या सर्वांचे सीडीआर चेक करायचे, या सर्वांच्या पाठीमागचा सूत्रधार कोण, हे शोधण्यासाठी चौकशी करावी, अशी मागणी माणिकराव कोकाटे यांनी केले.

# न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग

## लोकसभा अध्यक्षांना, राज्यसभा सभापतींना निवेदन सादर



नवी दिल्ली : घरात बेहिशेबी रोख रक्कम सापडल्याप्रकरणी चर्चेत आलेले उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांना त्यांच्या पदावरून हटविण्यासाठी संसदेत महाभियोगाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

सोमवारी, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, लोकसभेच्या १४५ खासदारांनी वर्मा यांच्याविरुद्ध आणलेल्या महाभियोग प्रस्तावावर स्वाक्षरी केली. राज्यसभेतील ५४ खासदारांनी महाभियोग प्रस्तावाला पाठिंबा दिला. खासदारांनी स्वाक्षरी केलेले निवेदन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांना सादर केल्यानंतर न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोगाची पुढील कार्यवाही सुरू झाली आहे. या महाभियोग प्रस्तावाला भाजप, कॉंग्रेस, टीडीपी, जेडीयू, सीपीएम यांसह विविध पक्षांच्या खासदारांचा पाठिंबा मिळाला आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारे अनमोल रत्न–शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जुलै**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस हे महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारे एक अनमोल रत्न असून राज्याच्या विकासासाठी सतत पणे धडपड करणारे नेतृत्व असल्याचे दिसते. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र आज प्रगतीपथावर जात असून राज्यातील उद्योग लघुउद्योग कृषी व सेवा आणि ग्रामीण विकास रस्ते , दळणवळण व परिवार या सर्व क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती होत आहे तर महाराष्ट्र राज्याच्या वैभवात भर घालणाऱ्या छत्रपती शिवरायांचे किल्ले राज्यातील देवस्थानाने तीर्थक्षेत्र या सर्वांचा विकास करण्यासाठी देवेंद्रजी फडणवीस कटिबद्ध असून नारायण गडाच्या विकासाला देखील देवेंद्र फडणवीस आणि पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला आहे आसे मत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी व्यक्त केले आहे. बीड जिल्ह्यातील दाखली पंढरी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या नारायणगड येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व महाराष्ट्राच्या



पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिर वृक्षारोपण व शालेय साहित्याच्या वाटपाच्या कार्यक्रमांमध्ये जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख हे बोलत होते. नारायण गडाचे महंत हरिभक्त परायण श्री शिवाजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे ,बीड ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष मनोज पाटील, मटका मुक्ता आघाडीच्या भाग्यश्री ढाकणे प्रीत कुकडेच्या राजू शहाणे नरेश पवार इत्यादी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी पुढे बोलताना जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी असे मत व्यक्त केले की देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात काम करत असणारे महाराष्ट्र सरकार हे सामान्य माणसाच्या हिताला प्राधान्य देणाऱ्या असून देवेंद्रजींच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेवटच्या माणसाचा अंत्योदय झाल्याशिवाय राहणार नाही अशा प्रकारचे गौरव उदगार देखील त्यानी याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमात नारायण गडाचे मठाधिपती हरिभक्त परायण शिवाजी महाराज यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व नामदार पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसानिमित्त आशीर्वाद देऊन शुभेच्छा दिल्या . बराणपुर चे सरपंच गणेश लांडे यांच्या पुढाकारातून संपन्न झालेल्या या कार्यक्रमास भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, भाग्यश्री ढाकणे यांनी देखील समायोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते पदाधिकारी व विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते.

# वाल्मीक कराडचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जुलै**



संतोष देशमुख हत्या आणि इतर संबंधित प्रकरणात बीडच्या विशेष मकोका न्यायालयाने मंगळवारी (दि.२२) वाल्मिक कराडची दोषमुक्ती याचिका फेटाळली. विशेष मकोका न्यायाधीश व्ही. एच. पाटवदकर यांच्या न्यायालयाने हा निर्णय दिला. यावेळी या खटल्यातील विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी युक्तिवाद केला.

संतोष देशमुख हत्या आणि इतर दोन प्रकरणात तसेच मकोका दोषारोपातून आपल्याला मुक्त करावे, यासाठीची याचिका वाल्मिक कराडच्या वतीने दाखल करण्यात आली होती. तर सरकार पक्षाच्या वतीने वाल्मिक कराडची संपत्ती जप्त करण्यासाठी न्यायालयात अर्ज करण्यात आला होता. यावरील दोन्ही बाजुंचे युक्तीवाद पूर्वीच पूर्ण झाले होते. आणि न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. मंगळवारी न्यायालयाने हा दोषमुक्ती अर्ज फेटाळला.

**दोषारोप निश्चिती लांबणीवर**

या प्रकरणात इतर आरोपींच्या वतीने दोषमुक्ती अर्ज दाखल करण्यात आले असून त्यावर ४ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे या प्रकरणातील दोषारोप निश्चिती मात्र लांबणीवर पडली आहे.

# कुशल मनुष्यबळामुळे राष्ट्राची प्रगती होते–डॉ.हेमंत वैद्य



**स्वा.सावरकर महाविद्यालयात रोजगार मेळावा**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जुलै**

कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीमध्ये कुशल मनुष्य बळाचा महत्त्वाचा वाटा असतो. कुशल मनुष्य बळामुळे देशाचा विकास साधला जातो. असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी केले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्त येथील जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड आणि सावरकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ जुलै रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याचे उद्घाटन भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड चेसहाय्यक आयुक्त सुशील उचले, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, सावरकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, शांतिनाथ डोरले, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना डॉ. हेमंत वैद्य म्हणाले की या मेळाव्याच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, याचा लाभ युवकांनी घ्यावा. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की विविध खाजगी कंपन्या शासकीय महा मंडळांनी तरुणांना रोजगाराच्या वाटा निर्माण केल्या आहेत. तरुणांनी या संधीचा फायदा घ्यावा असे सांगताना त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जीवन कार्याचा आढावा उपस्थितां समोर मांडला. महाविद्यालयातील कौशल्य विकास केंद्राचे प्रमुख सुहास जोशी यांनी प्रास्ताविक केले. या प्रसंगी ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांची रोजगार निर्मिती संदर्भातील प्रेरणादायी व्हिडिओ क्लिप दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रूपाली कुलकर्णी, प्रा.आसावरी राऊत यांनी केले.या रोजगार मेळाव्यामध्ये गुरुकुल इंग्लिश स्कूल बीड, एल.आयसी बीड, जीनियस इंग्लिश स्कूल बीड,टाटा इन्शुरन्स, एस. जी. सॉफ्टवेअर, गोविंद कार्स बीड, आय. टी एम स्किल अकॅडमी, जन शिक्षण संस्था, च्या वतीने अनुक्रमे सहशिक्षक,विमा सखीसुपरवायझर, मेकॅनिक हेल्पर रिलेशनशिप मॅनेजर, टेक्निशियन इत्यादी पदांसाठी मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या विविध महामंडळाचे स्टॉल लावण्यात आले होते, उपस्थित उमेदवारांना याची माहिती देण्यात आली.

# वाल्मिक कराड बाहेर येताच सर्वांना बघून घेतील

## संदिप तांदळेच्या व्हायरल व्हिडीओने खळबळ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ जुलै**

वाल्मिक कराडचा जवळचा सहकारी संदिप तांदळे या व्यक्तीने व्हिडीओ करत आ.सुरेश धस, आ.जितेंद्र आव्हाड आणि बाळा बांगर यांना अश्लिल शिवीगाळ केली आहे.

मस्साजोगचा सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टर माईंड असलेल्या वाल्मिक कराडचा जवळचा सहकारी असलेल्या एका व्यक्तीचा व्हिडीओ समोर आला आहे. संदिप तांदळे नावाच्या वाल्मिक कराडच्या सहकाऱ्यानं आपला एक व्हिडीओ शेअर करत खळबळ उडवून दिली आहे. संदिप तांदळेने आपल्या व्हिडीओमध्ये भाजपाचे आमदार सुरेश धस, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि बीडमधील बाळा बांगर उर्फ विजयसिंह बांगर यांना अश्लिल शिवीगाळ केल्याचे पाहायला मिळत आहे. आण्णा बाहेर आल्यानंतर सर्वांनाच बघणार अशी उघड धमकी देखील या व्यक्तीनं या व्हिडीओमध्ये दिली आहे.

# ना.पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा सप्ताहाच उदघाटन



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ जुलै**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पावलावर पाऊल ठेवून राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल, पशुसंवर्धन, मंत्री तथा जालना जिल्ह्ययाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे या जनसेवेचा वसा आणि वारसा चालवत आहेत. निस्वार्थ आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे पंकजाताई मुंडे यांचे नेतृत्व फुलत असुन आगामी आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली विविध विकासकामे होऊन जिल्हा सुजलाम सुफलाम होईल असे प्रतिपादन तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी आज केले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित २१ ते २६ जुलै दरम्यान शहरात शहर भाजपच्या वतीने सामाजिक सेवा सप्ताह राबविण्यात येत असून या अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमांचे उदघाटन आज तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

# परळी शहरात जुन्या वादातून चाकूहल्ला एक गंभीर जखमी, तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ जुलै**

परळी शहरातील बेलवाडी गणपती मंदिरासमोरील ऑटो रिक्षा पॉईंट येथे १९ जुलै रोजी दुपारी १ वाजता जुन्या वादातून चाकूहल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली. यामध्ये नागेश कांबळे ( रा. भीमनगर, परळी) यांना गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी परळी शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलीप नारायण कांबळे आणि त्यांचे दोन पुत्र बन्सी दिलीप कांबळे आणि परशुराम दिलीप कांबळे (सर्व रा. परळी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बन्सी कांबळे याने फिर्यादी अभिजीत कांबळे यांचे वडील नागेश कांबळे यांच्या पोटात चाकू खुपसून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे अभिजीत कांबळे याने फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.याप्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक १७२/२०२५ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम १०९, ११५(२), ३५२, व ३(५) BNS अंतर्गत गुन्हा नोंदवून पुढील तपासासाठी पोउनि अमोल शिंगणे यांच्याकडे तपास सोपवण्यात आला आहे.या प्रकरणात पोलिसांनी आरोपींना अटक केलेली असुन घटनास्थळी तात्काळ भेट देत पंचनामा, व्हिडिओ रेकॉर्डिंग व अन्य साक्षींची नोंद केली आहे.

# जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात परळीत भव्य निदर्शने

## विधेयक रद्द करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ जुलै**

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मुलभूत अधिकारावर गदा आणणारे महाराष्ट्र सरकारने पारित केलेले जन सुरक्षा विधेयक रद्द



करण्याच्या मागणीसाठी परळीत जनसुरक्षा विधेयक विरोधी कृती समितीच्या वतीने सोमवार दिनांक २१ जुलै रोजी परळीत भव्य निदर्शने करण्यात आली. तसेच राज्यपालांनी या विधेयकावर स्वाक्षरी न करता ते रद्द करावे अशा आशयाचे निवेदन परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या मार्फत राज्यपालांना देण्यात आले.

राज्य सरकारने नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे जनसुरक्षा विधेयक पारित केले आहे. या कायद्याच्या विरोधात परळीत जनसुरक्षा कायदा विरोधी कृती समितीच्या वतीने सोमवार दिनांक २१ जुलै रोजी मोंढा मार्केट येथे दुपारी १२ वाजता भव्य निदर्शने करण्यात आली. तसेच यावेळी जनसुरक्षा विधेयक रदद करावे, राज्य सरकारचा जाहीर निषेध, संविधान वाचवा देश वाचवा आदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.यावेळी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई, कम्युनिस्ट पक्षाचे नेते अजय बुरांडे, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष ड प्रकाश मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, कॉंग्रेसचे नेते वसंतराव मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, शिवसेनेचे तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष श्रीकांत पाथरकर, जेष्ठ नेते उत्तम माने, संभाजी ब्रिगेडचे सेवकराम जाधव, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे देवराव लुगडे महाराज, सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक रानबा गायकवाड, कॉ पांडुरंग राठोड, पत्रकार भगवान साकसमुद्रे, विद्यार्थी आघाडीचे सय्यद उमेर आदिंनी या विधेयकाच्या विरोधात आपले विचार मांडले. राज्य सरकारने आणलेला जनसुरक्षा हा कायदा सर्वसामान्य नागरिकांना भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकार आणि व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणार असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी शिक्षक नेते पी.एस.घाडगे, जगन्नाथ सोळंके, विठ्ठलराव झिलमेवाड, भगवान बडे, दता दहिवाळ, धम्मानंद क्षीरसागर, गौतम साळवे, ज्ञानेश्वर मुंडे, बालासाहेब गिते, प्रकाश वाघमारे, सय्यद जाबेर, अहेमद सय्यद, सय्यद फेरोज, यशवंत सोनवणे, दिपक सिरसाठ, मदन वाघमारे, शंकर शेजुळ, जावेद शेख, रंजना खरात, सुभाष सावंत, बाबासाहेब रोडे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते , सामाजिक कार्यकर्ते, सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किल्लेधारूरच्या 'जय किसान' मंडळाचा ऐतिहासिक निर्णय गणेशोत्सवात 'नारी शक्ती'ला नेतृत्वाची धुरा

## महिला कार्यकारिणीच्या हाती सूत्रे; राज्यात नवा आदर्श

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२२ जुलै**

'सन्मान नारी शक्तीचा' या उद्दिष्टाला अनुसरून, जय किसान गणेश मंडळाने २०२५ च्या गणेशोत्सवासाठी एक ऐतिहासिक निर्णय घेत पूर्णतः महिला कार्यकारिणीची स्थापना केली आहे. २१ जुलै २०२५ रोजी रात्री ८ वाजता झालेल्या बैठकीत ज्येष्ठ सदस्य, लहान बालक यांच्या मोठ्या संख्येने उपस्थितीत सर्वांच्या सहमतीने ही नवीन कार्यकारिणी स्थापन करण्यात आली. किल्लेधारूरचे हे मंडळ गेल्या तीन वर्षांपासून जिल्ह्यातून प्रथम येत राज्यात विशेष प्राविण्य मिळवत असल्याने हा निर्णय आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद बाब आहे.

राज्यातील गणेशोत्सव स्पर्धेत सातत्याने चमकदार कामगिरी करणाऱ्या जय किसान मंडळाने, यंदाही राज्य शासनाद्वारे आयोजित राज्यस्तरीय गणेशोत्सव स्पर्धेत सहभाग घेतला आहे. या पार्श्वभूमीवर, मंडळाच्या अनेक वर्षांच्या परंपरेत पहिल्यांदाच महिलांना नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली आहे, जो एक



अत्यंत प्रभावी आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय मानला जात आहे.

२०२५ गणेशोत्सव कार्यकारणी:

अध्यक्ष: सौ. ज्योती मनोज जगताप

उपाध्यक्ष: सौ.अंकिता ईश्वर खामकर, सौ.ज्योती ज्योतीबा तिबोले, सौ.स्वप्नील धनवडे

सचिव: सौ.पृथ्वी शुभम तिबोले

सहसचिव: सौ.प्रिती कुलदीप दरेकर

कोषाध्यक्ष: सौ.उर्मिला अमोल जगताप

कोषाध्यक्ष: सौ.भाग्यश्री सागर ढाणे

सहकोषाध्यक्ष: सौ.अश्विनी गणेश गिरी

वाद्य पथक अध्यक्ष: सौ.रोहिणी ज्ञानेश्वर पांचाळ

वाद्य पथक उपाध्यक्ष: सौ.साक्षी शेखर पवार

सांस्कृतिक अध्यक्ष: कु.विशाखा विश्वप्रकाश गायकवाड

या ऐतिहासिक निवडीमुळे यंदाचा गणेशोत्सव सोहळा अधिकच विशेष ठरणार असून, जय किसान गणेश मंडळाने समाजाला एक नवा संदेश दिला आहे. 'कसब्याचा राजा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मंडळाने घेतलेला हा निर्णय निश्चितच इतर मंडळांसाठी प्रेरणादायी ठरेल.

# कॉंग्रेस पक्षाच्या वतीने दिल्लीमध्ये ओबीसीच्या न्याय हक्कासाठी महासंमेलन : वसंत मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ जुलै**



ओबीसीच्या विविध न्याय हक्काच्या मागण्यासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष खा. श्री मल्लिकार्जुन खरगे, विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, अखिल भारतीय ओबीसी कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ.अनिल जयहिंद, महाराष्ट्र ओबीसी कॉंग्रेसचे अध्यक्ष भानुदास माळी यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २५ जुलै २०२५ रोजी तल कटोरा स्टेडियम, दिल्ली येथे कॉंग्रेस पक्षाच्या ओबीसी विभागाच्या वतीने देशपातळीवर महासंमेलन आयोजित केल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दिली.मनमोहन सिंग सरकारच्या काळात २०१४ मध्ये जातीनिहाय जनगणना – आर्थिक स्थिती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, स्त्री पुरुष मुले वारस कुटुंबाची रोजगार, स्वतःचे घर किंवा किरायाचे घर, नोंदी, वाहने, उत्पन्नाचे माध्यम, कुटुंबाची मालमत्ता इत्यादी प्रक्रिया राबवून – जनगणना केली.

## ताबा सूचना

प्रति,
१. सौ. कस्तुराबाई अशोक वाघमारे (कर्जदार)
पत्ताः– मु.पो. मुरंबी ता. अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५१७
२. श्री. नागोराव लक्ष्मण काशीकर (सह–कर्जदार)
पत्ताः– मु.पो. जवळगाव, ता. अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५१७
३. श्री. उत्तम नागु काशीकर
पत्ताः– मु.पो. जवळगाव, ता. अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५१७
४. श्री. दशरथ चोखोबा डुमने
पत्ताः– मु.पो. यल्डा, ता.अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५१७
५. श्री. वाव्हळे नरसिंग यशवंत
पत्ताः– पोखरी सायगाव, अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५२३
६. श्री. शंकर नारायण रोडेवाड
पत्ताः– ११५२०/२९/अ, सुंदर व्यंकटेश निवास, दत्त नगर, आण्णाभाऊ साठे चौक, नांदेड, जि.नांदेड ४३१ ६०१

विषयः– वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षित्तीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी अ‍ॅक्ट २००२ (२ रा) च्या सेक्शन १३(४) नुसार ताबा सुचना

संदर्भः बँकेची डिमांड नोटीस क्र. SARFAESI/06/7027-291/34 /2025-26 दिनांक १९.०५.२०२५ अन्वये.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय डिमांड नोटीस दिनांक १९.०५.२०२५ नुसार मी खालील सही करणार आपणास सुचित करीत आहे की ६० दिवसाची मुदत पूर्ण होवुन व वेळोवेळी आपणास थकीत कर्ज भरण्याची मुदत देवुन सुधा थकीत कर्ज रक्कम जमा न केल्यामुळे खालील प्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा कलम १३ (४) अंतर्गत ताबा घेण्यात येईल.

करीता आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०६.०८.२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता (१५ दिवसांच्या आत) किंवा त्यानंतर बँकेच्या वेळेनुसार केव्हाही आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी येत आहे. स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यास व पंचनामा तसेच इंव्हेन्टरी तयार करतांना सहकार्य करावे.

तसेच आपणास कळविण्यात येते की, वरील कार्यवाही करतांना आपण अथवा इतर कोणीही कुठल्याही प्रकारे कार्यवाही मध्ये अडथळे निर्माण केल्यास अथवा कार्यवाही थांबविण्याचा प्रयत्न केल्यास सदर्ह वर्तन हे फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील. कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्टः– मालमत्तेचे वर्णन

श्री. उत्तम नागु काशीकर गहाणदार/जमीनदार यांचे मौजे जवळगाव ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील ग्रामपंचायत घर क्र.११८९ ज्याचा प्लॉट क्र.२२ ज्यांचा सर्वे नं. २२४ क्षेत्रफळ पुर्व–पश्चिम ३९ फु. दक्षिण–उत्तर ३१ फु. असुन ज्यांच्या चतुःसिमा

खालीलप्रमाणेः–
पुर्वः– प्लॉट क्र.२३
पश्चिमः गावठाण रस्ता
दक्षिणः– रस्ता
उत्तरः– अण्णा हरि
(वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत)
अधिकृत अधिकारी

**अधिकृत अधिकारी**

# विषारी साप चावल्याने ३५ वर्षीय इसमाचा मृत्यु



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२२ जुलै - तालुक्यातील गणेशपूर,चिंचोली लिंबाजी येथील ३५ वर्षीय इसमाला विषारी सापाने चावा घेतल्याची घटना दि.२२ रोजी रात्री घडली आहे. अरुण बाबुराव खाडवे वय ३५ रा.गणेशपूर ता.कन्नड असे मयत इसमाचे नाव आहे.

अरुण खाडवे हे मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते.सोमवारी नेहमीप्रमाणे मोलमजुरी करून घरी आले होते,रात्री कुटुंबा सोबत एकत्र जेवण करून ते घरात झोपले असता रात्री १ वाजेच्या दरम्यान त्यांच्या हाताला काही तरी चावल्याने अरुण यांना जाग आली.तेव्हा त्यांना बाजूलाच साप दिसून आला.त्यामुळे त्यांना सापाने सर्पदशं केला असावा असा संशय आल्याने नातेवाईक शेजारी यांनी त्यांना तात्काळ चिंचोली लिंबाजी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले .प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना डॉक्टरांनी रुग्णवाहिकेतून छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले.मात्र वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.घाटीत डॉक्टरांनी तपासून त्यांना मयत घोषित केले.

मंगळवारी दुपारी घाटी रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.त्यानंतर सायंकाळी गणेशपूर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार. करण्यात आले.

अरुण खाडवे यांच्या पश्चात पत्नी,आई ,वडील,दोन मुली,एक मुलगा,तीन भाऊ ,दोन बहिणी असा परिवार आहे.

## उत्तम आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी 'स्मार्ट' टाकी लाँच

नाशिक : भारताची अग्रगण्य आणि विश्वसनीयपाणीसाठवण उत्पादक कंपनी, वेलस्पन वर्ल्डचा भाग असलेली सिंटेक्समहाराष्ट्रात घेऊन आली आहे एक नाविन्यपूर्ण सिंटेक्स 'स्मार्ट' टाकी, जी १००% फूड ग्रेड व्हर्जिन प्लास्टिकपासून बनवलेली ही टाकी, आता आरोग्य आणि स्वच्छतेस प्राधान्य देणाऱ्या प्रत्येक भारतीय कुटुंबासाठी एक स्मार्ट निवड ठरत आहे. भारतीय कुटुंबांची किफायतशीर गरज ओळखून, सिंटेक्स ने 'स्मार्ट' टाकी अत्यंत परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून दिली आहे, जेणेकरून उच्च दर्जाचे पाणीसाठवणूक उपायमहाराष्ट्रातील प्रत्येक घरापर्यंत सहज पोहोचू शकेल.

## भारताचे पहिले कफ क्लिनिक्स

मुंबई: महसुलाच्या निकषावर जगातील सर्वात मोठी, ग्राहक आरोग्य क्षेत्रात काम करणारी प्युअर-प्ले कंपनी तसेच कफ श्रेणीमधील विख्यात ब्रॅण्ड बेनाड्रिल ची निर्माती केनव्ह्यू असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया (एपीआय)च्या सहकार्याने 'कफ क्लिनिक्स' हा उद्योगातील पहिलावहिला उपक्रम सुरू केला आहे. या वैज्ञानिक उपक्रमाचा एक भाग म्हणून भारतभरात १० कफ सेंटर्स स्थापन करण्याची केनव्ह्यूची योजना आहे. या केंद्रांद्वारे आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी कफाची तपासणी व तत्सम मूल्यमापनांसंदर्भातील सर्वोत्तम वैज्ञानिक पद्धतींविषयीच्या ज्ञानाची व्याप्ती वाढावी तसेच या पद्धतींचा अधिक व्यापक स्तरावर वापर व्हावा या उद्देशाने 'कफ क्लिनिक्स' चालविली जातील.

## चुपा चुप्सच्या नवीन 'समझ के बाहर' मोहिमेने तिची गोड-आंबट चव केली मनोरंजक

छत्रपती संभाजीनगर- परफेट्टी व्हॅन मेले कंपनीच्या प्रतिष्ठित आणि मजेशीर गोड पदार्थ देणाऱ्या ब्रँडपैकी एक असलेल्या चुपा चुप्सने एक नवीन मोहीम सुरू केली आहे जी त्यांच्या महत्त्वपूर्ण गोड आणि आंबट चवीचा प्रभाव जिवंत ठेवते. एका ताज्या नवीन टीव्हीसी मधून, ही मोहीम गोड आणि आंबट या चवींचे मिश्रण करून सामान्य गोष्टींना सुद्धा मजेदार बनवून कशी मजा देऊ शकते या कल्पनेवर आधारित आहे. रोजच्या क्षणांमध्ये काहीतरी मजा आणण्याच्या उद्देश्याने तयार केलेली ही मोहीम एक थोडे विचित्र पण अगदी हलकेफुलके वळण घेते, कारण त्यामध्ये चुपा चुप्स गोड आणि आंबट जेली तर्क आणि कल्पनाशक्ती यांना कशी टक्कर देते हे दाखवले आहे. अगदी सामान्य चवीसह, ही फिल्म सांगूही शकत नाही अशा गोष्टींकडे वळण घेते ज्यात गोड आणि आंबड चव एकमेकांमध्ये गुंततात आणि तेव्हाच तर्काच्या गोष्टी सोडून दिल्या जातात.

## वियर एप्टीट्यूट टेस्ट २०२६ च्या एमबीए/पीजीडीएम प्रवेशांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

मुंबई - ७५ वर्षांच्या दैदिप्यमान वारशासह झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट ही भारतातील एमबीए/पीजीडीएम प्रवेशांसाठीची सर्वाधिक विश्वासार्ह आणि काळाच्या कसोटीवर खरी उतरलेली परीक्षा मानली जाते. एक्सएएमआई (झेविअर असोसिएशन ऑफ मॅनेजमेंज इस्टिट्यूट) च्या वतीने एक्सएलआरआय - झेविअर स्कूल ऑफ मॅनेजमेंटतर्फे घेतली जाणारी ज़ेवियर एप्टीट्यूट टेस्ट २०२६ रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी घेतली जाणार आहे. भारतभरातील २५० हून अधिक आघाडीच्या बी स्कूल्समध्ये ज़ेवियर एप्टीट्यूट टेस्ट स्वीकारली जाते, हे एक वैशिष्ट्य आहेच. पण त्याचसोबत या परीक्षेतील मुल्यांकनासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्वंकष, ॲप्टिट्यूडवर भर देणाऱ्या पद्धतीतून मॅनेजमेंट क्षेत्रातील प्रतिभेला प्रोत्साहन देण्याची अनेक वर्षांची परंपराही तितकीच महत्त्वाची आहे.

## विप्रो गिफ्फी कडून सत्यराज आणि रम्या कृष्णन यांच्या साथीने सादर

छत्रपती संभाजीनगर : विप्रो कंझ्युमर केअर अंड लायटिंगच्या डिशवॉश जेल ब्रँड असलेल्या 'गिफ्फी' ने नुकतीच नावीन्यपूर्ण टीव्ही जाहिरात प्रसिद्ध केली आहे. यात प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेते सत्यराज आणि रम्या कष्णन हे प्रमुख भूमिकेत आहेत. भारतीय स्वयंपाकघरातल्या रोजच्या भांडी घासण्याच्या आव्हानाला एका सुंदर परफॉर्मन्समध्ये बदलण्याची क्षमता यात असून याद्वारे गिफ्फीची स्वच्छतेची क्षमता दर्शवते.मनोरंजन आणि दैनंदिन कामातील सुसंगतता यांचा मिलाप साधत, सदर जाहिरातीत सत्यराज एक शांत शेफच्या रुपातून स्वयंपाकघरातला भयंकर योद्ध्याच्या भूमिकेत रुपांतरीत होतो. तर रम्या कृष्णन तिची खास उपस्थिती दर्शवते. हे दोघे मिळून हट्टी तेलाच्या डागांचा सामना करतात. यातून गिफ्फी हा स्वच्छतेच्या बाबतीत एक विश्वसनीय आणि ताकदवान साथीदार ठरतो.

## ऋषी सक्सेना दिसणार सायलेंट लव्हर आणि पोलिसांच्या भूमिकेत

सोनी सबवरील आगामी कौटुंबिक मालिका 'इत्ती सी खुशी' ही अत्यंत वेगळ्या संकल्पनेमुळे तसेच सुंबुल तौकीर खान (अन्विता दिवेकरच्या भूमिकेत), वरूण बडोला (सुहास दिवेकर) आणि रजत वर्मा (विराट) यांसारख्या कलाकारांच्या दमदार टीममुळे प्रेक्षकांमधली उत्सुकता वाढवत आहे. या मालिकेत संजयच्या भूमिकेत ऋषी सक्सेना दिसणार आहे. तो एक चाणाक्ष नजरेचा पोलीस अधिकारी असून त्याच्यामुळे कथानकाला वेगळे वळण मिळेल. अन्विता आणि विराटच्या जगात संजय प्रवेश करतो आणि त्यामुळे त्यांच्या जगात वादळ घेऊन येतो.संजय हा माणूस नेहमीच शांत, स्थिर आणि विश्वासार्ह व्यक्ती आहे.

## 'घरवाली पेडवाली'मध्ये पारस अरोरा जीतूच्या भूमिकेत!

नाविन्यपूर्ण कथानकाचे मनोरंजन देण्याप्रती आपली कटिबद्धता कायम राखत एण्ड टीव्ही नवीन काल्पनिक मालिका 'घरवाली पेडवाली' लवकरच सुरू करणार आहे. पेनिन्सुला प्रोडक्शन्सद्वारे निर्मित या नवीन कौटुंबिक विनोदी मालिकेमध्ये विलक्षण अलौकिक शक्तीसंदर्भातील ट्विस्ट आहे, ज्यामधून हास्यपूर्ण, गोंधळयुक्त व हृदयस्पर्शी क्षणांचे मनोरंजन मिळेल. या मालिकेमध्ये प्रमुख पात्र आहे साधा-भोळा जीतू, ज्याचे जीवन वाटते तितके सामान्य नाही. त्याच्या दोन आई व दोन वडिल आहेत, त्याचे दोन बॉसेस् आहेत आणि नशीबातील विलक्षण बाब म्हणजे त्याच्या दोन पत्नी आहेत.

# विद्यार्थी संसद निवडणुकीत समीक्षा बिडवे व प्रेमराज पाटील विजयी

### कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात प्रत्यक्ष मतदानाचा अनुभव



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२२ जुलै - कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी 'कॅबिनेट निवडणूक' आयोजित करण्यात आली.शालेय विद्यार्थ्यांना लोकशाही निवडणूक पद्धत समजण्यासाठी विद्यालयात बाल संसद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या निवडणुकीत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष लोकशाही पद्धतीने मतदानाची प्रक्रिया अनुभवली.

निवडणूक प्रक्रियेत ४३९ विद्यार्थिनी व ६२३ विद्यार्थी असे एकूण १०६२ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदानाद्वारे विद्यार्थी संसदेच्या प्रतिनिधींची निवड करण्यात आली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदानाद्वारे सहभाग घेत विद्यार्थी संसदेची निवडणूक संपन्न झाली. या निवडणुकीत समीक्षा सचिन बिडवे मुख्यमंत्री प्रेम धनराज पाटील उपमुख्यमंत्री गौरी नंदकुमार अकोलकर सांस्कृतिक मंत्री पुनम बाबासाहेब धनेधर स्वच्छता मंत्री महेक शहनबाज शेख क्रीडामंत्री सार्थक सुनील शेजवळ शिक्षण मंत्री भावेश रत्नाकर सोनवणे शिस्त मंत्री या विद्यार्थ्यांची मिळालेल्या मतांच्या आधारावर निवड करण्यात आली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया,मतदानाचे महत्त्व आणि लोकशाही मूल्यांची जाणीव झाली.

विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व पालक आणि शिक्षकांनी अधोरेखित केले आहे.

यावेळी संतोष परदेशी यांनी निवडणुकीचा निकाल घोषित केला.यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून संजय शिरसाठ, प्रदीप सनंसे, रविंद्र पाटील, संगीता अहिरे यांनी काम बघितले.

# देवेंद्रजी फडणवीस यांच्या, वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर



खुलताबाद : भद्रा मारोती मंदिराच्या परिसरात दि २२ जुलै रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री. श्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस खुलताबाद तालुक्यात कुठेही बॅनर, पोष्टर न लावता आज राज्यात रक्ताचा तुटवडा असल्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करून साजरा करण्यात आला व मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मदत करुन साजरा करण्यात आला यावेळी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आ प्रशांत बंब यांच्या प्रमुख उपस्थितीत भद्रा मारुती मंदिर परिसरात, रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, खुलताबाद शहरात ७६ व, बाजार सावंगी येथे ९० जणांनी रक्तदान त भाग घेऊन रक्तदान केले

शासकीय रुग्णालय छत्रपती संभाजीनगर रक्तपेढी यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर घेण्यात आले या रक्तदान भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, भद्रा मारोती संस्थानचे अध्यक्ष मिठ्ठु पा. बारगळ, तालुका अध्यक्ष प्रकाश चव्हाण, शहराअघक्ष परसराम बारगळ तालुका सरचिटणीस ,सतीश दांडेकर, मा उपसभापती दिनेश अंभोरे ज्ञानेश्वर नलावडे, ज्ञानेश्वर बारगळ गणेश हजारी, सुखदेव ठेंगडे अमोल गवळी संदीप निकम किशोर भावसार योगेश बारगळ ज्ञानेश्वर वर्दे सागर मतकर, राजेंद्र बडे संतोष घुसिंगे, काशिनाथ तुपे, शंकर अंभोरे अनिल करपे, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते अनेक रक्तदात्यांनी आज वाढदिवसानिमित्त रक्तदान केले.

# डॉ.धनंजय दातार यांच्यातर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट



छत्रपती संभाजीनगर, २१ जुलै २०२५ : करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेलीय. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवरही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे.

'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'च्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग डॉ.धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ६ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ५ ते १० लिटर्स क्षमतेचे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर या उपकरणांचा समावेश होता. याआधी गेल्या वर्षीही ८ रुग्णांना श्री. दातार यांनी अशीच मदत केली आहे.

याप्रसंगी बोलताना डॉ.धनंजय दातार म्हणाले, माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आजही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात. करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज 'रिक्षा म्ब्युलन्स' या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले. गेल्या वर्षी आणि यंदाही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढेही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत. फुफ्फुसाच्या आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या पुनर्वसन कार्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या डॉ. पूर्वी देवानी यांनी सूत्रसंचालन केले. 'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'चे संस्थापक चालक डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई व त्यांच्या पत्नी वैशाली प्रभुदेसाई यांनी यावेळी संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

डॉ. प्रभुदेसाई म्हणाले, आयुष्य आरोग्यपूर्ण घालवणे महत्त्वाचे असते आणि त्यासाठीच सर्वांनी आरोग्य, योग्य जीवनशैली व श्वासाचे महत्त्व ओळखणे गरजेचे आहे. सकारात्मक दृष्टीकोण, योग्य उपचार, नियमित व्यायाम या जोरावर फुफ्फुसाच्या आजारांचे रुग्ण सर्वसाधारण आयुष्य जगू शकतात. आम्ही अशा रुग्णांचे समुपदेशन तथा यशस्वी पुनर्वसन करुन त्यांना आनंदी जीवन जगायला शिकवतो.

# आश्विन पाटील याची एमपीएससीतून महसूल सहाय्यक पदावर निवड - महाविद्यालयाचा व संस्थेचा गौरव



सोयगाव,दि.२२ जुलै - येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगावचा माजी विद्यार्थी आश्विन पाटील याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत यश संपादन करून महसूल सहाय्यक या पदावर यशस्वीरीत्या निवड मिळवली आहे.ही निवड स्पोर्ट्स कोटा अंतर्गत झाली असून ही बातमी संपूर्ण महाविद्यालय व अजिंठा शिक्षण संस्था परिवारासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. आश्विन पाटील याने बी.ए.पदवी संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातून पूर्ण केली असून तो वेट लिफ्टिंग क्रीडा प्रकारात राज्यस्तर तसेच राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आहे. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रात सातत्य राखत त्याने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे व सचिव प्रकाश काळे यांनी आश्विनचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्याच्या यशाचा गौरव केला आहे.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,प्रादिलीप बिरुटे,प्रा.भास्कर टेकाळे, डॉ.विक्रम भुतेकर,डॉ.ज्योती आधाने आणि क्रीडा विभाग प्रमुख डॉ.निलेश गाडेकर यांनीही आश्विन पाटील याचे अभिनंदन करत त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.शिस्त,चिकाटी आणि संघर्ष यांच्या बळावर घडलेली यशोगाथा आश्विन पाटील,संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचा उजवा तारा असे म्हटले जात आहे.

# लायन्स क्लब ऑफ एंजेल्स तर्फे वृक्षारोपण महाअभियान एकत्र येऊन हरित भविष्याच्या सेवेसाठी - जगावर प्रेम करा



छत्रपती सभाजीनगर लायन्स क्लब ऑफ एंजेल्स औरंगाबादतर्फे माँ चंचला देवी नगर, फेस ३, गोलवाडी येथे वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी जयेश पुरवार आणि अतिश सवाईवाला यांनी वृक्षारोपणासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देत या अभियानाला यशस्वी चालना दिली.

या उपक्रमात एंजेल्स क्लबतर्फे अभिमानाने ३०० झाडे लावण्यात आली. या महान कार्यास पाठिंबा दिल्याबद्दल लायन्स सुरेश शुक्ला यांचे आभार. साकला लँडस्केपिंग, जी २०२२ पासून पर्यावरण क्षेत्रात कार्यरत आहे, त्यांनी ३०० झाडे लायन्स क्लब ऑफ एंजेल्सला दान केली. त्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे संभाजीनगरमध्ये वाढत चाललेले तापमान. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी लायन्स क्लब ऑफ एंजेल्सने या वृक्षारोपण महाअभियानात संपूर्ण सहकार्य केले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पहिले उपजिल्हा गव्हर्नर राहुलजी औसेकर, क्षेत्र अध्यक्ष लायन्स जयदीप घुगे, झोन अध्यक्ष लायन्स डॉ. अश्विनजी जयस्वाल, लायन्स संजीव गुप्ता, एंजेल्स क्लबच्या अध्यक्षा नीतूजी शिंदे, सचिव रीता जयेश पुरवार, कोषाध्यक्ष राखीजी पांडे, तसेच रश्मी नायर, रंजू साहनी, अल्पा जैन, भाग्यमजी, अंजू ठक्कर, शुभा झवर, पुष्पाजी, मोनिकाजी, रियाजी, प्रियांकाजी, शीतलजी, श्वेताजी, हरशीनजी, नैनाजी, हिनाजी, श्वेता, भाविका, ज्योती यांचा सहभाग महत्त्वाचा होता. पूर्व महापौर विकास जैन, जयेश पुरवार, कृष्णा गुंडे, कैलाश चौहान, विजय गावडे, प्रकल्प व्यवस्थापक सापू व मोहन गज मुंडे, सामाजिक समरसता (आरएसएस) यांचेही वृक्षारोपणात विशेष योगदान लाभले.

सोलापूर तरुण भारत CHANGE IN NAME

I HAVE CHANGING MY NAME FROM

OLD NAME : SHE AHAMAD SHE GAFUR

TO

NEW NAME : AHEMAD GAFUR SHAIKH

AS PER MY DOCUMENTS

ADDRESS : MAKRANPUR TQ KANNAD DIST AURANGABAD (MAHARASHTRA) 431103

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डि.एस. तांबे दिवाणी न्यायाधिश कनिष्ट स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

किरकोळ अर्ज क्र. ३५१/२०२५ पु. तारीख २६/०८/२०२५

अर्जदार : १.- सुल्याबाई जयवंतराव मगर, वय-६४, वर्षे, धंदा घरकाम, रा. मुंडवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद २-सचिन जयवंतराव मगर, वय ३६ वर्षे, धंदा मजुरी. रा. मुंडवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३-चैताली रविंद्र मगर, वय-३४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मुंडवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४-तन्माय रविंद्र मगर, वय-१६ वर्षे धंदा-शिक्षण, रा. मुंडवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद. अ.पा.क. चैताली भ्र. रविंद्र मगर जन्म दाती आई ५.-प्रमोद रविंद्र मगर, वय-१२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. मुंडवाडी ता. कन्नड, जि. औरंगाबाद. अ.पा.क. चैताली भ्र. रविंद्र मगर जन्म दाती आई

गैरअर्जदार : निरंक

अर्ज -वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत (Bombay Regulation Act

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल ॲड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे जयवंतराव कुशाबा मगर हे दिनांक ०६/११/२०२० रोजी मौजे मुंडवाडी, ता. कन्नड येथे मयत झाले असुन त्यांचा अंत्यविधी मौजे मुंडवाडी येथे करण्यात आला आहे. अर्जा सोबत ग्राम पंचायत मुंडवाडी यांचे मयताचे प्रमाण पत्र दाखल केले आहे. तसेच मयताचा मुलगा रविंद्र जयवंतराव मगर हा देखील दिनांक १४/४/२०२५ रोजी मयत झाला आहे अर्जदार यांचे वडील मयत झाल्याने मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला घेण्यासाठी अर्जदारास वारसप्रमाण पत्राची आवश्यकता आहे. मयतास अर्जदारा व्यतिरिक्त ईतर कोणीही वारस नाही त्यामुळे अर्जदार मयताच्या वारसप्रमाण पत्राची न्यायालयात मागणी करीत आहे

ज्या अर्थी सदरहु जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल सबब आज दिनांक १६/७/२०२५ रोजी माझे सही निशी व मा न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

दिनांक १६/७/२०२५

आदेशावरुन

लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. डी. एस. तांबे मॅडम, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. १५६/२०२५ पुढील तारीख २५/८/२०२५

अर्जदार १) सर्जेराव पांडुरंग रोडे, वय ४२ वर्षे, धंदा- शेती. रा. मु. बडोद पो. घाटशेंदा ता. कन्नड, जि. औरंगाबाद२) नाशिकराव पांडुरंग रोडे, वय- ५१ वर्षे, धंदा- शेती, रा. मु. वडोद पो. घाटशेंद्रा ता. कन्नड, जि. औरंगाबाद३) रेखा भ्र. देविदास वाघ, वय- ४४ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सातगाव डोंगरी, ता. पाचोरा, जि. जळगाव, ४) आलकाबाई भ्र. श्रीराम मनगटे वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. घाटशेंद्रा ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैर अर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ व्ही. बी. काळे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील नामे पांडुरंग हैबती रोडे हे होते ते दिनांक १६/०५/२०१९ रोजी मौजे वडोद वाडी ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आई नामे गयाबाई पांडुरंग रोडे या होत्या त्या सुध्दा दिनांक १७/०१/२०२५ रोजी वडोद वाडी ता. कन्नड येथे मयत झालेल्या आहे दोन्ही मयांचे अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, अर्जदार यांना मयत गयाबाई पांडुरंग रोडे यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच, विविध योजनेचा लाभ घेण्यासांठी, सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १७/०७/२०२५

आदेशावरुन

लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.व्ही.डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. ३५२/२०२५ पुढील तारीख ३०/०८/२०२५

अर्जदार : १. केशरबाई भ्र. पांडुरंग नलावडे, वयः ८० वर्ष, धंदाः घरकाम, रा.मु. शिवराई पो. बनशेंद्रा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. सुखदेव पि. पांडुरंग नलावडे, वयः ४८ वर्ष, धंदाः नोकरी, रा. भोलेश्वर कॉलनी कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. रतन पि. पांडुरंग नलावडे वयः ४६ वर्ष, धंदाः व्यापार, रा. बजाज नगर, वडगाव कोल्हाटी, ता. जि. औरंगाबाद. ४. भगवान पि. पांडुरंग नलावडे वयः ४२ वर्ष, धंदाः ड्रायव्हर, रा. कनकावती नगर साखर कारखाना, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. दिपाली भ्र.बाबासाहेब उगले, वयः ४० वर्ष, धंदाः घरकाम, रा.गट नं. १७०, पि सो ५८ महावीर नगर, ग्रोथ सेंटर, महानगर-१. तिसगाव, बजाज नगर एम.आय.डी.सी. वाळुज, औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन , व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत नामे पांडुरंग सखाराम नलावडे यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. व्ही. बी. काळे यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. मयत नामे पांडुरंग सखाराम नलावडे यांचे अर्जदार क्र. १ पत्नी असुन २ व ५ मुले व मुलगी आहे. नामे मयत नामे पांडुरंग सखाराम नलावडे यांना अर्जदार क्र.१ ते ५ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत मयत पांडुरंग सखाराम नलावडे अर्जदार क्र.१ चे पति व २ ते ५ चे वडील हे दि. २८/१२/२०१० रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा कन्नड, ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. मयत पांडुरंग सखाराम नलावडे यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राचो आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिः १७/ ०७/२०२५

आदेशावरुन

लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## अग्रलेख...

# गाजराची पुंगी

ज्योतिष हे शास्त्र आहे की ठोकताळ्यांचे थोतांड आहे यावर सर्वत्र बरीच चर्चा होत असते. अनेकदा छातीठोकपणे भाकिते वर्तविणारे अनेक जण तोंडघशी पडतात आणि कोणतेही भाकीत खरे ठरत नाही हेच यामागचे कारण असावे. अशा ठोकताळ्यांच्या पिकामुळे ज्योतिषावर प्रश्नचिन्हे निर्माण होत असूनही, छातीठोकपणे भाकिते वर्तविणाऱ्यांची संख्या राजकारणामुळे अधिकच फोफावली आहे असे म्हणता येईल. राजकारणातील अनेक उन्हाळे-पावसाळे, अनेक चढउतार पाहिल्यानंतर असे काही ठोकताळे वर्तविणे हा आपल्याला अनुभवाने बहाल केलेला अधिकार आहे, अशा समजुतीत अनेक जण भाकिते वर्तविल्याचा आव आणून स्वत:स राजकीय भविष्यवेत्ते म्हणवून घेतात. काही नेते मात्र, भाकिते वर्तवितानाही सावधगिरी बाळगत असतात. आपले भाकीत खरे ठरेल किंवा नाही याचीच त्यांना खात्री नसावी हे त्याचे कारण असावे. महाराष्ट्रात अशी भाकिते वर्तविणारे आणि भाकिते वदवून घेणारे काही नामांकित राजकीय नेते त्यांच्या छातीठोक ठोकताळ्यांमुळे बरेचसे बदनाम झाले असून त्यांचे कोणतेच भाकीत कधीच खरे ठरत नसल्याने त्यांच्या वक्तव्यांची विश्वासार्हतादेखील वादग्रस्त ठरली आहे. त्यामुळे, राजकारणातील कुडमुडे ज्योतिषी म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्यामध्ये उद्धव ठाकरे यांच्या गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांचा क्रमांक बराच वरचा लागतो. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनाही भाकिते वर्तविण्याची सवय आहे, पण तसे करताना ते संजय राऊत यांच्याप्रमाणे छातीठोक विधाने करत नाहीत. उलट, भाकिते वर्तविण्यासाठी आपण कोणी ज्योतिषी नाही अशी कबुली देऊनच ते राजकीय घडामोडींची भाकिते वर्तवीत असल्याने, अनेक जण त्यांच्या भाकितांवर डोळे झाकून विश्वास ठेवतात आणि बरेचदा पवारांचे भाकीत चुकल्यानंतर आपली फसगत झाल्याचे त्यांच्या लक्षात येते. पवार यांनी कोणतेही वक्तव्य जाहीरपणे केल्यास त्याच्या नेमके उलटे काही घडणार असल्याची ज्यांची अनुभवसिद्ध खात्री असते, ते मात्र, पवारांच्या भाकिताआड दडलेले भविष्य शोधण्याचा प्रयत्न करतात आणि आपले स्वत:चे ठोकताळे मांडून राजकारणातील भविष्याचा वेध घेतात, तेव्हा त्यापैकी बरेचसे भविष्य खरे ठरत असल्याच्या अनपेक्षित आनंदाचा अनुभव अनेक राजकीय विश्लेषकांनी घेतला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांचा दारुण पराभव झाल्यानंतर महाराष्ट्रात या पक्षांनी सत्तास्थापनेची संधी पूर्णपणे गमावल्याचे स्पट झाले होते. त्याच दरम्यान, शरद पवार यांनीही तशी कबुली दिली आणि नेहमीप्रमाणे पवार यांच्या वक्तव्यामागे दडलेल्या भविष्याचा वेध घेताना, महाविकास आघाडीच्या स्थापनेची चाहूल लागलेल्यांना, महाराष्ट्राच्या सत्तेचे पारडे फिरणार असल्याचा सुगावा लागला होता. त्यानंतर झालेल्या नाट्यपूर्ण सत्तांतराचा इतिहास आता संपूर्ण देशाला अवगत आहे. महाविकास आघाडी नावाचा एक अचंबित करणारा राजकीय नाट्यप्रयोग याच इतिहासामुळे जन्माला आला आणि त्याचे बरेचसे श्रेय शरद पवार यांना जाते, हेही आता महाराष्ट्रास ठावूक आहे. केवळ शरद पवार यांनी मुख्यमंत्रिपदाचे गाजर दाखवून उद्धव ठाकरे यांना भाजपसोबतच्या युतीमधून बाहेर काढले आणि महाविकास आघाडीची सत्ता स्थापन केली हेही सर्व जण जाणतात. त्याआधी, आपण मुख्यमंत्री वगैरे होऊ हे आपल्या स्वप्नातही नव्हते, अशी कबुली देणारे उद्धव ठाकरे अनपेक्षितपणे सत्तेवर आले आणि संजय राऊत यांचा राजकीय कुडमुडे ज्योतिषी म्हणून उदय झाला, हेही अनेकांस ठावूक आहे. ठाकरे यांचा सत्तासूर्य कधीच मावळणार नाही, पुढील पंचवीस वर्षे राज्यात महाविकास आघाडीचीच सत्ता राहणार येथपासून, उद्धव ठाकरे देशाचे नेतृत्व करणार अशा लंब्याचौड्या भाकितांनी राऊत यांनी राजकारणाचा तो काळ अक्षरश: भारावून टाकला होता.

आपल्या मुखातून बाहेर पडणारी भाकिते ऐकण्याकरिता आणि ती जनतेपर्यंत पोहोचविण्याकरिता काही माध्यमेदेखील उत्सुक असतात हे लक्षात आल्यानंतर तर राऊत यांनी जणू भाकितांचा कारखानाच सुरू केला, पण एकामागून एक भाकिते भाकडच ठरल्यानंतरही त्यांची भाकिते मांडण्याची खुबी मात्र सातत्याने खुलत गेली. कोणते सरकार किती दिवस टिकणार, कोणास केव्हा डच्चू मिळणार, अशा भाकितांचा सातत्याने भडिमार करणाऱ्या राऊत यांच्या नव्या भाकितामध्ये मात्र गांभीर्याचा अंश दिसू लागल्याने त्याची दखल घेणे गरजेचे ठरते. अर्थात, या भाकितास, राजकारणात घडत असलेल्या इतर घडामोडींचा पुरेसा आधारदेखील दिसत असल्याने कुडमुड्या भाकिताचे वजन वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुळात, भाजपशी सत्तेच्या राजकारणात दोन हात करून भाजपचा पराभव करणे हे कोणा एकाच विरोधी पक्षाच्या आवाक्यातील काम नाही हे लक्षात आल्याने महाविकास आघाडीच्या प्रयोगानंतर भाजपविरोधकांनी बांधलेली इंडिया आघाडी नावाची कडबोळ्यांची मोट फार काळ टिकणार नव्हती, हे कोणा भविष्यवेत्त्याने न वर्तविताही सहज समजणारे स्पष्ट भाकीत होते. महाविकास आघाडीचीही तीच अवस्था होणार याबाबतही अनेकांस शंका नव्हती. त्यामुळे महाविकास आघाडी किंवा इंडिया आघाडी नावाच्या गाजराच्या पुंग्या फार काळ वाजणार नाहीत आणि जेव्हा त्या पुरत्या मूक होऊन जातील तेव्हा मोडून खाण्याच्याही उपयोगाच्या राहणार नाहीत, हेही ठरलेले होते. कदाचित त्यामुळेच, लोकसभा निवडणुकीतील इंडिया आघाडीच्या राष्ट्रीय पराभवानंतर या आघाडीतील एकएका पक्षाने काढता पाय घेण्यास सुरुवात केली आणि त्याच्या स्थापनेसाठी पुढाकार घेणाऱ्या शरद पवार यांच्या पक्षाची शकले होऊन एक गटच भाजपच्या वळचणीत दाखल झाला. त्यानंतरच्या घडामोडीही फारशा जुन्या नाहीत. महाविकास आघाडी पंचवीस वर्षे सत्तेवर राहणार असे छातीठोक भाकीत वर्तविणाऱ्या राऊत यांनी आता सूर बदलून महाविकास आघाडी गुंडाळण्याच्या भाकिताचे संकेत सुरू केले असून, त्यांच्या पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही त्यास दुजोरा देणारे सूर आळविण्यास सुरुवात केल्याने, इंडिया व महाविकास या नावाच्या दोन आघाड्यांच्या गाजराच्या पुंग्या आता मूक झाल्यात जमा आहेत.

आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीतून काढता पाय घेतला आहेच, तर महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याची तयारी काँग्रेसने सुरू केल्याने उद्धव ठाकरे यांच्या गटाचे महाविकास आघाडीतील स्थान डळमळीत झाले आहे. अशा परिस्थितीत, या आघाडीसोबत राहण्यात आपल्यालाच स्वारस्य नाही असा सूर ठाकरे यांनी लावला असावा. महाविकास आघाडीत स्थान न मिळाल्यास राज ठाकरे यांच्या पक्षासोबत निवडणुका लढवाव्यात यासाठी उद्धव ठाकरे पराकोटीचे प्रयत्न करत आहेत. महाविकास आघाडीतील संवाद आता संपला असल्याने अशा परिस्थितीत आघाडीत राहण्यात अर्थ नाही अशा आशयाचे वक्तव्य करून ठाकरे यांनी आघाडीला सोडचिठ्ठीची सूचना दिली असली, तरी राज ठाकरे यांना सोबत घेण्याच्या प्रयत्नांस अद्याप पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने ठाकरे गटाची कोंडी झाली आहे. महाविकास आघाडीच्या घोर अपयशानंतर शरद पवार यांच्या राजकारणाने पुरेशी सावधगिरी बाळगणे पसंत केले आहे. पक्षातील अति निष्ठावंतांच्या एका तुकडीचे सत्तेच्या राजकारणातील पुनर्वसन अगोदरच पार पडले असून उरलेल्या गटासाठी सोयीस्कर राजकारणाचे सारे दरवाजे त्यांनी खुले ठेवले आहेत. त्यामुळे भविष्यात सत्तेच्या राजकारणातील शरद पवार यांचे जुने अनुभव आणि डावपेच पुन्हा कामाला येतील, अशी चर्चा आजच सुरू झाली आहे. तसे काही झालेच, तर उद्धव ठाकरे कोणासोबत असतील, त्यांच्या राजकारणाचे भविष्य काय असेल, याची उत्तरे त्यांनाच शोधावी लागतील. शरद पवार यांना समजून घेण्यास शंभर जन्मदेखील पुरणार नाहीत, असे एक भाकीत संजय राऊत यांनीच वर्तविले होते. ते खरे ठरत असल्याचा साक्षात्कार आता मात्र त्यांना होत असेल आणि त्यामुळे उद्धव ठाकरे यांनाही ते पटले असेल यात शंका नाही. ▮

## अभीष्टचिंतन

**चंद्रशेखर बावनकुळे**

# देवेंद्रजी नावाचे अत्तर...

देवेंद्रजींचा सहवास अत्तरासारखा आहे. अत्तर हे नुसते सुगंधी द्रव्यच नाही तर, अत्तर म्हणजे भावना, परंपरा, आपुलकीचा आनंद वाटणारा एक अनमोल घटक. एक सकारात्मक ऊर्जा अत्तराचा सुगंध निर्माण करतो. माझ्यासाठी असेच आहेत देवेंद्रजी. महाराष्ट्राच्या राजकारणातला एक बलाढ्य, बुद्धिमान आणि लोककल्याणकारी नेता. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र आता वेगवान झाला. महाराष्ट्र आता थांबणार नाही.

महाराष्ट्रात विशेष जनसुरक्षा विधेयकाच्या विधिमंडळ संयुक्त चिकित्सा समितीचे अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. हे विधेयक समाजाच्या सुरक्षेसाठी सर्वोच्च आहे. समितीचे कामकाज करताना मला, माझ्या २१ वर्षांच्या विधिमंडळ कामकाजातील एक वेगळा अनुभव ठरला. महाराष्ट्रातील सर्वांचेच या विधेयकाकडे लक्ष वेधून होते. कायद्याचा दुरुपयोग होणार नाही, ही दक्षता तर घ्यायचीच होती. त्याचवेळी भारतीय संविधानाचे रक्षण करायचे होते. कडवी डावी विचारसरणी असलेले व भारतीय संविधानाविरुद्ध चीड निर्माण करणारे लोक आपल्या समाजाची शांतता बिघडविण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रवृत्तीविरुद्ध कायदेशीरदृष्ट्या दोन हात करण्याची तयारी सरकारने या निमित्ताने केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात नक्षलवादाविरुद्ध ही लढाई सुरू झाली. मुख्यमंत्री फडणवीस गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्या भागात अनेकदा ते मुक्कामी असतात. त्यांनी नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी सर्व प्रयत्न केले. त्याच प्रयत्नाची पुढची पायरी म्हणजे, विशेष जनसुरक्षा विधेयक. जंगलात असलेला क्रूर नक्षलवाद आता शहरात आला आहे. त्याचे स्वरूप पांढरपेशे असल्याने समाजासाठी ते अधिक काळजी करणारे आहे. समाजविघातक कारवाई करणाऱ्या ६४ संघटना महाराष्ट्रात आहेत. आणलेला कायदा हा भारतातील इतर राज्यांत अस्तित्वात असलेल्या कायद्यापेक्षा प्रोग्रेसिव्ह आहे. या महत्त्वाच्या कायद्याच्या निर्मिती प्रक्रियेत माझा महत्त्वाचा सहभाग होता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रोत्साहनामुळे हे शक्य झाले, याची पूर्ण जाणीव मला आहे. महाराष्ट्राच्या संसदीय इतिहासातील महत्त्वाचे पान म्हणजे हे कामकाज आहे. या प्रोत्साहन प्रक्रियेतील बीजे २००४ मध्ये पहिल्यांदा आमदार झालो, तेव्हा पेरली गेली. मला आठवते, राजकारणात कार्यकर्ता व आंदोलनाचा अनुभव असूनही विधिमंडळाच्या कामकाजाचे बारकावे मला माहिती नव्हते. त्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी मला मार्गदर्शन केले. आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठी सरकारी निधी कसा खेचून आणायचा यासाठी वेगवेगळी संसदीय आयुधे आणि जे कौशल्य लागते त्याबाबत ते मला वेळोवेळी सांगायचे. काहींशी जन्माचे ऋणानुबंध जुळतात, पक्की नाती तयार होतात. ही नाती रक्ताच्या नात्यापलीकडची असतात. देवेंद्र फडणवीस हे नाते याचपद्धतीचे. रक्ताच्या नात्यापलीकडचे.

देवेंद्र फडणवीस आणि माझा परिचय मागील ३५ वर्षांपासून आहे. मी अतिशय सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून आलो आहे. भारतीय जनता पार्टीत मी कार्यकर्ता म्हणून काम करायला सुरुवात केली तेव्हा माझ्यातील कार्यकर्त्याला घडवले, मला संस्कारित केले आणि माझ्या कारकीर्दीला नवा आयाम देण्याचे काम केले ते ज्येष्ठ नेते नितीनजी गडकरी यांनी. नितीनजी आणि माझ्या वयात खूप अंतर होते; त्यामुळे मी कायमस्वरूपी त्यांना पितृस्थानी मानत आलो आहे. बापाचा एकप्रकारचा धाक असतो आणि त्याच्याशी अनेक गोष्टी बोलता येत नाहीत; त्या भावाशी मात्र सहजपणे करता येतात. राजकारणात माझ्या भावाची ही भूमिका जर कुणी पार पडली असेल तर ते आहेत देवेंद्र फडणवीस!



२०१४ मध्ये ते मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांच्या मंत्रिमंडळात मला ऊर्जामंत्री व उत्पादन शुल्क मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. माझी ऊर्जामंत्री म्हणून पाच वर्षांची कारकीर्द त्यांच्या सोबतीनेच केवळ यशस्वी झाली, असे आता विचार करताना वाटते. त्या पाच वर्षांच्या काळात देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अनेक प्रशासकीय बारकावे मला शिकायला मिळाले. आता, त्यांच्याच विश्वासामुळे नागपूर व अमरावती जिल्ह्यांचा पालकमंत्री आहे. या दोन्ही जिल्ह्यांच्या विकासासाठी त्यांचे भगीरथ प्रयत्न सुरू असल्याचे आपण बघत असतो. गेली तीन वर्षे मी भाजपचा प्रदेश अध्यक्ष होतो. अनेक मान्यवरांनी हे पद भूषविले होते. त्यामुळे थोडेफार दडपण होतेच. देवेंद्रजींनी हे दडपण घालविले. काही वर्षांपूर्वी त्यांनीसुद्धा प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी अतिशय दमदारपणे सांभाळली होती. त्यादरम्यानचा त्यांचा अनुभव यावेळी मला त्यांनी सांगितला. आता, राज्याचा महसूल मंत्री म्हणून काम करताना, त्यांच्या सर्वांगीण अभ्यासाची पदोपदी जाणीव होते. महसूल विभागात होत असलेल्या बदलावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची छाप आहे. एप्रिल महिन्यात पुण्यात झालेल्या महसूल परिषदेनंतर वेगवान पद्धतीने हा विभाग कामी लागला.

मुळात, आर्थिक नियोजन आणि आर्थिक प्रगतीचे यश समाजाच्या शिडीच्या वरच्या बाजूला असलेल्या लोकांद्वारे मोजले जाणार नाही, तर समाजाच्या सर्वांत खालच्या पायरीवरील लोकांद्वारे मोजले जाईल. हा विचार महायुती सरकारचा आहे. सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत १९४७ चा तुकडेबंदी कायदा रद्द केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला. यामुळे १ जानेवारी २०२५ पूर्वीच्या १ हजार चौरस फुटांच्या जमिनींना कायदेशीर मान्यता मिळणार आहे. नागरिकांच्या समस्यांची सोडवणूक सुलभतेने होण्याकरिता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर राज्यभर राबविले जात आहे. दोनशे रुपयांमध्ये संपूर्ण शेतीची हिस्से मोजणी व पाचशे रुपयांमध्ये वाटणी पत्र देण्याचा निर्णय विभागाने घेतला. यातून शेतकऱ्यांचा आर्थिक भार हलका होऊन त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महिला सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान, वारकऱ्यांसाठी विमा योजना व घरकुलासाठी मोफत वाळू हे निर्णय लोककेंद्रित आहेत. पुण्यात झालेली महसूल अदालत हजारो प्रलंबित प्रकरणांचा निकाल देणारी ठरली.

देवेंद्र फडणवीस यांना केवळ महाराष्ट्रच नाही तर देशाच्या राजकारणाची जाण आहे. त्यांनी अनेक राज्यांत निवडणुकीचे व्यवस्थापन केले आहे. संपूर्ण ३५ वर्षांच्या कालावधीत मला त्यांच्याकडून एक गोष्ट शिकता आली ती म्हणजे, लोकप्रतिनिधी म्हणून तुम्हाला यशस्वी व्हायचे असेल तर तुम्ही अभ्यासू व चौकस असले पाहिजे. त्यांचे आरोग्यक्षेत्रातील कार्य खूप प्रभावी व अचाट आहे. तसे पाहता मुख्यमंत्री सहायता निधीची स्थापना १९६७ मध्ये झाली; पण २०१५ मध्ये देवेंद्रजींनी त्याला नवे परिमाण मिळवून दिले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचारासाठी आर्थिक साहाय्य देण्याचा या निधीचा उद्देश आहे. २०१५ मध्ये 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष' स्थापन करून या उपक्रमाला गती दिली.

अटल सेतू, समृद्धी महामार्ग, मुंबई कोस्टल रोडच्या पाठोपाठ मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नवी मुंबई आणि नाशिकसारख्या शहरांमध्ये एकूण ३५० किमीहून अधिक लांबीच्या मेट्रो प्रकल्पांचे जाळे विस्तारत आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचा प्रकल्प पूर्ण होण्याच्या दिशेने आहे. मुंबई एअरपोर्ट इंफ्लुएंस नोटीफाईड एरिया म्हणजे, आठ लक्ष रोजगार निर्मिती औद्योगिक वसाहतीचा नैना प्रकल्प, जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, आपले सरकार पोर्टल, महाराष्ट्रात ११ वर्षांत अनेक नवीन विमानतळे विकसित झाली. यात अमरावती, सिंधुदुर्ग, शिर्डी, नवी मुंबई अशा अनेक विमानतळांचा समावेश असून यामुळे पर्यटन, उद्योग आणि गुंतवणुकीला नवे गतिमान प्रवेशद्वार मिळाले आहे. कोल्हापूर, अमरावती, शिर्डी, सोलापूर, नांदेड विमानसेवा सुरू झाली आहे. मुख्यमंत्री सौर कृषी पंप आणि कृषी वाहिनी, निळवंडे, गोसीखुर्द आणि इतर धरणे निर्मिती, मुंबईतील धारावीकरांच्या स्वप्नातलं घर त्यांना मिळवून देण्याच्या उद्देशाने धारावी पुनर्विकास प्रकल्प तयार होतो आहे. येत्या सात वर्षांत ५० हजार घरे तयार केली जाणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेतून राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागात ५० लाख कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकारणार आहेत. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून प्रत्येक महिलेला महिन्याला १५०० रुपये देण्यात येतात. आतापर्यंत राज्यातील २.५ कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळतो आहे. महायुती सरकारने राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतीसाठी लागणारी वीज मोफत केली आहे. आता शेतकऱ्यांना एक रुपया देखील वीजबिल भरावे लागणार नाही. शिवाय थकित वीजबिल देखील माफ करण्यात आले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनांअंतर्गत राज्यातील एक कोटी पंधरा लाखांहून अधिक शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजार मिळतात. श्री चक्रधर स्वामींच्या नावाने रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन केले आणि श्रीचक्रधर स्वामी यांचा भाद्रपद शुक्ल द्वितीया हा दिवस 'अवतार दिन' साजरा करण्याचा शासनाचा ऐतिहासिक निर्णयही सरकारने घेतला.

नेतृत्व रात्रीतून घडत नाही. त्यासाठी ध्यास असावा लागतो. ते नगरसेवक म्हणून निवडून आले ते साल होते १९९२ ! खरंतर ही निवडणूक १९८९ मध्ये होणार होती. पण तेव्हा त्या निवडणुकीत त्यांचं वय भरत नव्हतं. मात्र त्यांच्या नशिबाने ती निवडणूकच पुढे गेली आणि ते नगरसेवक झाले. वाढदिवसानिमित्त त्यांचे अभीष्टचिंतन करताना या माझ्या लोकनेत्याला दीर्घायुष्य मिळो आणि त्यांच्या हातून जनतेची सेवा घडो; त्यांची प्रगती हीच आमच्यासाठी आनंदाची कुपी आहे. मला आठवते, आपले लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी नागपूरने महाराष्ट्राला दिलेली भेट, असे देवेंद्रजींचे वर्णन केले होते. ते यथार्थ आहे. ▮

(महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य)

## वेध

**हेमंत सालोडकर**

# गुन्हेगारी थंडावणारे 'ऑपरेशन थंडर'

नागपूर शहर आणि ग्रामीण पोलिसांनी गुन्हेगारी आणि अमली पदार्थविरोधात 'ऑपरेशन थंडर' मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत वेळेचे उल्लंघन करणारी प्रतिष्ठाने तसेच अवैध धंद्यात सक्रिय असणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. मागील काही दिवसांपासून नागपूर शहर आणि जिल्ह्यात पोलिसांनी सुरू केलेल्या ऑपरेशन थंडर मोहिमेमुळे गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक निर्माण झाला आहे.

कुठल्याही सभ्य समाजात गुन्हे, गुन्हेगारी आणि अवैध धंद्याला स्थान नसावे, अशी अपेक्षा असते. सुसंस्कृत आणि कायद्याच्या राज्यात तर अशा दुष्कृत्यांना कधीच थारा द्यायला नको. पण समाजात जशी चांगली माणसे असतात, तशीच काही समाजविघातकही असतात. त्यांच्यामुळे चांगल्या लोकांना जीवन जगणे कठीण होते. अशावेळी गुन्हेगारी विश्वातल्या लोकांना वठणीवर आणण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था उत्तम ठेवण्यासाठी पोलिसांना 'ऑपरेशन थंडर' मोहीम हाती घ्यावी लागते. गस्तीवर कधी कधी गुन्हेगारी लोकांची चौकशी करताना सज्जनांनाही पोलिसी खाक्या अनुभवावा लागतो. पण त्याकडे त्यांनी विधायक दृष्टीने, सहकार्याच्या भावनेने पाहिले तर पोलिसांना आणि समाजालाही मदत होईल. पूर्वी पोलिस चारचाकी, दुचाकीने गस्त घालायचे. त्यामुळे बरेचदा गुन्हेगारांचे फावत होते. पोलिसांचे वाहन आले की कुठेही लपता येत होते. पण आता 'ऑपरेशन थंडर'अंतर्गत पोलिसांनी गनिमी कावा अवलंबिला आहे आणि पायदळ गस्त सुरू केली आहे. यामुळे गुन्हेगारांना पोलिस आल्याची माहिती होत नाही. यामुळे गुन्हेगारांचे रात्रीचे खेळ बऱ्याच प्रमाणात नियंत्रणात आले आहेत. पोलिसांना संशयास्पद वाटणाऱ्या व्यक्तींची चौकशी करून संपूर्ण माहिती घेतल्यानंतरच त्यांना सोडण्यात येते. रहदारीच्या रस्त्यावर सर्व वाहनांची कसून झडती सुरू करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवर गोधन तस्करी, सुगंधित तंबाखू, अवैध रेती उत्खनन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. 'ऑपरेशन थंडर' अंतर्गत रात्री उशिरापर्यंत सुरू राहणारे बार, रेस्टॉरेंट यांच्यावर मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे. वेळेचे उल्लंघन कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण करतात. या मोहिमेंतर्गत शहर आणि ग्रामीण भागात धाडसत्र सुरू राहणार असून नियम मोडणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. रात्री उशिरा सुरू असलेली अनधिकृत आस्थापने आणि बेकायदेशीर मद्य विक्रीबाबत माहिती कळविण्याचे आवाहनही पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

'ऑपरेशन थंडर'अंतर्गत पोलिसांनी रेकॉर्डवरच्या गुन्हेगारांची चौकशी सुरू केली असून त्यांना संबंधित पोलिस स्टेशनला हजेरी लावण्यास सांगितले आहे. ते आले नाहीत तर पोलिस गुन्हेगाराच्या घरी जाऊन त्याची झाडाझडती घेतात. त्याची संपूर्ण चौकशी, त्याचा विद्यमान फोन नंबर याची खात्री केल्यानंतरच पोलिसांच्या तावडीतून सुटका होते. त्यामुळे आता गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा वचक निर्माण झाला आहे. जुने गुन्हेगार सुतासारखे सरळ होऊन पोलिसांचे खबरे म्हणून कामाला लागले आहेत.

शहरी भागात कारवाई सुरू असतानाच ग्रामीण भागात खापरखेडा, सावनेर येथे पोलिसांनी मोठ्या प्रमाणात देशी कट्टे जप्त केले आणि आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून अवैध साहित्य जप्त करण्यात आले. बाजारगाव येथे मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांचा साठा पकडला. गुन्हेगारी रोखण्यासाठी आरोपींवर थेट 'मोक्का' कायदा लावला जात आहे. पोलिसांनी गुन्हेगारांवर वचक निर्माण करतानाच समाजजागृतीही सुरू केली आहे. विशेष करून शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना यात सहभागी करून घेण्यात आले. नागपूर शहरात नशेच्या विरोधात पावले उचलत, पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ नष्ट केले. या संपूर्ण उपक्रमामध्ये शहरातील महाविद्यालये व शाळांमधील विद्यार्थ्यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. अमली पदार्थांच्या विळख्यात अडकलेल्या समाजाचे नुकसान व व्यसनाच्या आहारी गेलेल्या युवकांचे भवितव्य कसे उद्ध्वस्त होते, याचे विदारक चित्र विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखवण्यात आले. नागपूर पोलिसांनी घेतलेला हा पुढाकार युवकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने निश्चितच एक सकारात्मक आणि प्रेरणादायी पाऊल म्हणता येईल. नशेच्या विरोधात समाजाची सशक्त भूमिका उभारण्यासाठी अशी कडक आणि समाजप्रबोधनात्मक कारवाई गरजेची आहे, हे या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. यासाठी नागपूर शहर आणि ग्रामीण पोलिस अभिनंदनास पात्र आहेत. त्यांनी ऑपरेशन थंडर ही मोहीम यापुढेही सुरू ठेवावी, ही अपेक्षा. ▮

९८५०७५३२८१

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# कौशल्यांची पूर्वतयारी

प्रशिक्षित आणि कौशल्यपूर्ण कर्मचारी ही प्रत्येक उद्योग-व्यवसायाची मूलभूत गरज. कर्मचाऱ्यांमध्ये आवश्यक कौशल्य निर्माण व्हावे, यासाठी प्रत्येक कंपनी व्यवस्थापन आपापल्या पद्धतीने सदैव प्रयत्न असते. यासाठी विशेष प्रशिक्षणासारखे उपक्रम प्रयत्नपूर्वक केले जातात. यामागे कर्मचाऱ्यांनी अधिक चांगले व परिणामकारक काम करावे, हीच भावना असते. माहिती-तंत्रज्ञान व संगणक सेवा क्षेत्रात तर सतत बदलते तंत्रज्ञान व कार्यपद्धती यावर आधारित कौशल्य विकासाला सातत्याने चालना देणे आवश्यक असते. या महत्त्वाच्या कामी भारतातीलच नव्हे, तर जागतिक स्तरावरील संगणकीय सेवा उद्योगातील कर्मचाऱ्यांमध्ये विशेष कौशल्य वृद्धी व्हावी व त्याचा काम या क्षेत्रातील देश-विदेशात काम करणाऱ्या कंपन्या व कर्मचाऱ्याना प्रकर्षाने व्हावा, यासाठी बंगळुरूमध्ये विशेष प्रकारची कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. विविध उद्योग व व्यवसाय करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये विशेष प्रयत्नपूर्वक कौशल्य विकास व्हावा, या कारणासाठी सुरू करण्यात आलेल्या कौशल्य विकास केंद्रांची उत्साहवर्धक छाप आता जागतिक पातळीवर कशी पडत आहे, त्याचीच ही यशोगाथा...

या संदर्भातील व्यवस्थापकीय पृष्ठभूमी म्हणजे, या जागतिक कौशल्य विकास केंद्रांची स्थापना विशेषतः संगणक सेवा व माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राला अद्ययावत स्वरूपातील प्रशिक्षित कर्मचारी या उद्योगांना उपलब्ध करून द्यावेत व त्याचवेळी माहिती-तंत्रज्ञान व संगणकशास्त्र विषयातील पात्रताधारक विद्यार्थी-उमेदवारांना त्यांच्या विषयाशी संबंधित क्षेत्रात रोजगारक्षम बनवावे, अशा दुहेरी उद्देशाने करण्यात आली. तुलनेने कमी वेळात या उद्देशांची पूर्तता होण्याचे चित्र निर्माण झाले आहे. या प्रासंगिक व उत्साहवर्धक प्रयत्नांच्या पहिल्याच टप्प्यात वॉलमार्ट ग्लोबल टेक, एसएपी लॅब्ज, थेस्स, इंट्यूट व बार्कलेज या संगणकीय सेवा क्षेत्रातील आघाडीच्या व प्रस्थापित कंपन्यांनी, कौशल्य विकास केंद्रांची सुरुवात केली व अल्पावधीतच त्याला जागतिक पातळीवर प्रस्थापित केले. या कौशल्य प्रशिक्षण केंद्रांचा व्यावसायिक उपयोग व महत्त्व लक्षात घेता, या नव्या पण महत्त्वाच्या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.

अशा प्रकारे माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अधिक प्रगत व आवश्यक स्वरूपातील कौशल्य विकास साधून त्याला संगणक सेवा उद्योगासाठी उपयुक्त व परिणामकारक बनविण्यासाठी संगणकीय कौशल्य विकास केंद्रातील प्रशिक्षणाला कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञानाचा अद्ययावत उपयोग, माहितीचे संकलन-प्रक्रिया व विश्लेषण, शिक्षण-प्रशिक्षणासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग, संगणकविषयक विशेष कार्यपद्धती व सुरक्षा इत्यादी विषयांची जोड देण्यात आली. परिणामी, या कौशल्य विकास प्रयत्नांना चांगली गती व प्रगती प्राप्त होऊ लागली. अशा प्रशिक्षित कौशल्यधारक उमेदवारांना देश-विदेशातून वाढीव मागणी सुरू झाली. यासंदर्भातील उल्लेखनीय बाब म्हणजे, या वर्षीच्या प्रारंभीच वॉलमार्ट ग्लोबल टेकतर्फे कृत्रिम बुद्धिमता प्रशिक्षण अकादमीची सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम प्रामुख्याने ऑनलाईन पद्धतीने अमलात आणण्यात येत आहे. या पद्धतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा विषय आणि वापर या उभयतांवर सुरुवातीपासूनच भर दिला जात असून, त्याचा उपयोग वॉलमार्टला देश-विदेश पातळीवर होत आहे. एसएपी लॅब्ज इंडियाने घेतलेल्या पुढाकारानुसार त्यांच्या संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधन व विकास व्यवसायाला पूरक पद्धतीने कौशल्य विकास केंद्राचा उपक्रम राबविला आहे. मुळात जर्मनीमध्ये मुख्यालय असणाऱ्या एसएपी लॅब्जने नव्या तंत्रज्ञानाला संशोधनाची जोड देऊन त्याच्या व्यावसायिक अंमलबजावणीवर भर दिला आहे. यासाठी कंपनीने कृत्रिम बुद्धिमतेला तंत्रज्ञानावर आधारित प्रत्यक्ष अनुभवाची जोड दिल्याने त्याचा नेमका फायदा नवीन उमेदवार-कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून कंपनीला होत आहे. याचाच एक पुढचा व प्रगत टप्पा म्हणून कंपनीने कर्मचाऱ्याच्या कौशल्य विकासविषयक निकड आणि त्यांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय पावले उचलली आहेत. बार्कलेजसारखी कंपनी पण आता नव्या-जुन्या कर्मचाऱ्यांच्या कौशल्य विकासावर प्राधान्याने काम करीत आहेत. संगणकीय क्षेत्रातील कर्मचारी विकास केंद्राच्या माध्यमातून भावना मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांच्या कौशल्य विकासाच्या माध्यमातून त्यांची उत्पादकता व परिणामकारक उपयुक्तता आता जागतिक स्तरावर वाढली आहे. भारत आणि भारतीयांची पात्रता क्षमता व उपयुक्तता वाढत्या कौशल्यांमुळे संगणक क्षेत्रात जागतिक स्तरावर सर्वमान्य झाली आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## तरुण भारतातील स्वागतार्ह बदल

तरुण भारत या राष्ट्रवादी विचारांच्या दैनिकाला शंभर वर्षे पूर्ण होत असताना आपण दैनिकाच्या एकंदर रचनेत केलेला बदल खरोखरच लक्षणीय आणि स्वागतार्ह आहे. पाने वाढवून ग्रामीण भागातील बातम्यांचे मोठ्या प्रमाणात प्रकाशन करण्यात येत आहे ही गोष्ट चांगली आहे. तरुण भारतने सुरू केलेला बीज अंकुरे अंकुरे हा तर एकदमच अभिनव उपक्रम असून त्यात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग घेतला जात असल्याने पर्यावरण हा महत्त्वपूर्ण विषय तर लोकांपर्यंत पोहोचतोच आहे, त्यासोबतच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची जुनी परंपरा यायोगे पुनरुज्जीवित होण्यास सुद्धा मदत होईल असे वाटते.

मला सर्वांत जास्त आवडलेली गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे दररोज पहिल्या पानावर येणारे विचारपुष्प. संघविचार संपूर्ण राष्ट्रांत प्रसारित करून तो रुजविण्यासाठी ज्यांनी आपले पूर्ण आयुष्य घालवले अशा सर्व थोर प्रचारकांचे विचार या माध्यमातून देण्यात येतात. आजच्या अनेक स्वयंसेवकांना सुद्धा माहिती नसलेल्या जुन्या पिढीतील संघ कार्यकर्त्यांच्या विचारांची उजळणी या निमित्ताने पुन्हा एकदा होत आहे, ही आमच्यासारख्या स्वयंसेवकांना अतिशय आनंददायी व समाधानाची बाब आहे. आपले या उपक्रमासाठी मन:पूर्वक अभिनंदन आणि तरुण भारताच्या पुढील प्रगतिशील वाटचालीसाठी शुभेच्छा!

**नारायण गोविंदराव मेहरे**/नागपूर

## वाचक पत्रे

### मार्गदर्शक गीता

सोमवार २१ जुलैच्या अंकातील 'विद्यार्थ्यांना मिळणार गीतेचे धडे' हा अग्रलेख वाचला. अतिशय महत्त्वाचा विचार यातून मांडला गेला आहे. उत्तराखंड पाठोपाठ हरयाणा सरकारने शाळेतील प्रार्थनेत भगवद्गीता श्लोक म्हणणे अनिवार्य केले आहे. खरोखरीच ही काळाची गरज आहे. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरुक्षेत्रावर त्याच्या मनातील संभ्रम दूर व्हावा म्हणून उपदेश केला. वास्तविक तो उपदेश कालातीत आहे. काल, आज आणि उद्याही लागू पडणारा आहे. आज पाच हजार वर्षे झाली तरी त्याचे महत्त्व तसूभरही कमी झालेले नाही. कोणत्याही एका जात, धर्म, पंथ यासाठी ही गीता नाही तर समस्त मानवजातीसाठी मार्गदर्शन करणारी आणि त्यांचे कल्याण करणारी भगवद्गीता आहे. आज गीता भारतातच नाही तर संपूर्ण जगात अभ्यासिली जाते. गीतेतून अध्यात्म जीवनाचे महत्त्व तर कळतेच पण मनुष्य नैतिक मूल्यांनी परिपूर्ण होतो. शिक्षणाचा पाया जर मजबूत असेल तरच भविष्य उज्ज्वल राहील ही सुरुवात बालपणी मनावर रुजली पाहिजे. मानवी जीवनाचे सार गीतेत आहे. प्रत्येक प्रश्नाचे, समस्यांचे उत्तर त्यात आहे.

कर्म हा गीतेचा गाभा आहे. कर्म केल्याशिवाय काहीही साध्य होत नाही. चांगले-वाईट यांची ओळख होणे, संयम ठेवणे, विकारांपासून अलिप्त राहणे हा एक अभ्यास आहे. हे लक्षात आले तरच परिस्थितीनुसार वागणे शक्य आहे. कर्म करताना कर्तव्याची जाणीव ठेवणे आणि कर्तव्याचे पालन करताना मनाचे संतुलन राखून समतेचा अंगीकार कसा करावा हा उपदेश गीतेत आहे. भगवद्गीता म्हणजे अमृत आहे. आपल्या देशातील सर्वच राज्यांत, सरकारने सर्वच शाळांतून आवर्जून हा विचार करून तसे पाऊल उचलणे आवश्यक आहे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### दीप अमावास्या उत्साहात साजरी करूया

दीप अमावास्या या दिवशी घरातील सर्व दिवे स्वच्छ करून त्याची पूजा केली जाते. दिवा हे ज्ञानाचे, वृद्धिंगतेचे प्रतीक. अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्याच्या मार्गाचा मुख्य आधार म्हणजे दिवा. एका दिव्यापासून हजारो दिवे लावले जातात. दिवे आपल्या जीवनातील अंधार दूर करून आपल्याला प्रकाश देतात. अशा या दिव्याची पूजा म्हणजे दीपपूजा. काही लोक याला गटारी अमावास्या असे संबोधून हिंदू धर्माची अपकीर्ति करत आहेत. मुळात गटारी असा काही सण आपल्या धर्मात नाही. आषाढ अमावास्येच्या दुसऱ्या दिवसापासून श्रावण मास चालू होत असल्याने आणि हा पवित्र मास मानला जात असल्याने बरेच जण त्या काळात मांसाहार वर्ज्य करतात. काही जणांना पुढे महिनाभर, तर काही जणांना चातुर्मास संपेपर्यंत मांसाहार करायला मिळणार नसल्यामुळे या अमावास्येच्या दिवशी दारू आणि मांसाहर यांचे सेवन करतात. या कुप्रथेचे मोठ्या प्रमाणात उदात्तीकरण करण्यात येते. या चुकीच्या प्रथेच्या विरोधात जागृती व्हायला हवी. या सणाला दीप अमावास्याच म्हणावे, अगदी चेष्टेने सुद्धा गटारी म्हणू नये. कोणीही या दिवशी दारू प्यायला सांगत नाही, उलट दिव्यांची पूजा करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करायला सांगतात. आजही या दिवशी महाराष्ट्रातील लाखो मराठी घरांत मनोभावे दीपपूजन करतात, नैवेद्य दाखवतात. खूप आनंददायी आणि मंगल अशी ही दीप-अमावास्या आपण सर्वांनी उत्साहात साजरी करूया आणि आपली संस्कृती जपूया. ▮

**वर्षा आवदे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## हिंगोली, जवळाबाजार येथे भव्य रक्तदान शिबीर, वृक्षारोपन कार्यक्रम, दिव्यांग विद्यार्थ्यांना भोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त हिंगोली आणि जवळा बाजार येथे भारतीय जनता पक्षाच्यावतीने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते तर औंढा नागनाथ तालुक्यातील जलालधाबा येथे शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी शाळेत ५५ रोपट्यांचे वृक्षारोपन करीत वाढदिवस साजरा केला.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाढदिवसानिमित्त बॅनर्स, होर्डींग्ज न लावता मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये निधी देण्याचे तसेच सामाजिक उपक्रम साजरे करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला हिंगोली भारतीय जनता पक्षाने प्रतिसाद देत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त येथील भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालयात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, सरचिटणीस उमेश नागरे, माजी शहराध्यक्ष प्रशांत सोनी, पवन उपाध्ये, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, उपाध्यक्ष संतोष टेकाळे, माजी नगरसेवक उमेश गुठ्ठे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, माजी शहाराध्यक्ष मनोज शर्मा, मुळे, शाम खंडेलवाल, हमीद प्यारेवाले, ॲड के के शिंदे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.









या रक्तदान शिबीरात राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवसानिमित्त पोलिस दलातील अधिकारी व कर्मचारी यांनीही मोठ्या संख्येन रक्तदान केले. यावेळी पोलिस दलातील अधिकारी उपस्थित होते.

औंढा नागनाथ तालुक्यातील जवळाबाजार येथे रक्तदान शिबिराचे आयोजन मंगळवारी( दि.२२)जुलै रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मा. जिल्हा परिषद सदस्य अंकुशराव आहेर यांच्या हस्ते झाले. या रक्तदान शिबिरामध्ये १०४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले.यावेळी मा.जिल्हा परिषद उपाध्यक्ष मिलिंद यंबल,मा. जिल्हा परिषद सदस्य अंकुश आहेर, सतीश सोमानी ,तालुकाप्रमुख राजू आहेर, रावसाहेब अंभोरे ,गणेश गाढवे, निळकंठ अंभोरे ,धनंजय तेरसे, यशवंत रावळे, रावसाहेब जोगदंड, नागनाथ राखे, अभिषेक विभुते ,गणेश राखोडे, सुभाष राखोडे नवनाथ कोरडे बबन सोनवणे दत्तराव राखोडे मारोती गाढवे माणिकराव गाढवे, डॉ.वसंत लोनसने मनीष डफडे माणिकराव भुमरे, अक्षय बोबडे पिंटू नाईक मंचक रणमाळ यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या रक्तदान शिबिराचे आयोजन भाजपा जवळाबाजार मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरास अंकुश आहेर ,राजू आहेर यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

हिंगोली येथील दिव्यांग, मुकबधीर विद्यालयात भारतीय जनता पक्षाच्यावतीने विद्यार्थी, विद्यार्थींनीनी भोजन देण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, मनोज शर्मा, उमेश नागरे, संतोष टेकाळे यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

औंढा नागनाथ तालुक्यातील जलालधाबा येथे शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य गजानन कुटे यांचय मार्गदर्शनाखाली श्रीमती पी एफ बांगर कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ वाढदिवसानिमित्त ५५ रोपट्यांचे वृक्षारोपन करण्यात आले. प्रा गजानन वाबळे, प्रा राम भुक्तर, प्रा संतोष कांयदे, प्रा आनंद कोपले, प्रा संदीप जायभाये, प्रा द्रोपदा जगताप, प्रा अनुजा जोंधळे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होत्या. औंढा नागनाथ येथेही भाजपच्यावतीने संत नामदेव सभागृहात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सुरजितसिंह ठाकूर यांच्यासह पांडुरंग पाटील, ॲड गणेश ठाकूर, आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरफोडीच्या तयारीत असलेले चौघे पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

शहरात घरफोडीच्या उद्देशाने फिरणाऱ्या चौघांना शहर पोलिसांच्या डीबी पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून एक कार, तीन मोबाईल, लोखंडी सब्बल, मिरचीपूड असा एकूण ४ लाख ५९ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी चौघांवर मंगळवार दि २२ रोजी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून त्यांच्याकडून अनेक घरफोड्या उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

हिंगोली शहरात मागील काही दिवसांपासून घरफोडीचे प्रमाण वाढल्यामुळे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शहर पोलिसांच्या पथकाला परिणामकारक गस्तीबाबत तसेच रात्रीच्यावेळी गस्ती सोबतच दिवस-ाही गुन्हेगारांची माहीती घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलिस निरीक्षक संदीप मोदे, उपनिरीक्षक रा-हुल महिपाळे, जमादार संजय मार्के, अशोक धामणे, संतोष करे, शेख मुजीब, गणेश लेकुळे, गणेश वाबळे यांच्या पथकाला बाहेर जिल्ह्यातील काही गुन्हेगार हिंग-ोली शहरात आल्याची गोपनीय माहीती मिळाली होती. त्यावरून या पथकाने सायंकाळपासूनच त्या व्यक्तींचा तसेच त्यांच्याकडे असलेल्या कारचा शोध सुरू केला होता. यावेळी एका ठिकाणी कार आढळून आल्यानंतर पोलिसांनी कारमधील चौघांची चौकशी सुरू केली. मात्र पोलिसांना पाहताच त्यांची घाबरगुंडी उडाली. त्यामुळे पोलिसांनी चौघांनाही अटक केली आहे. यामध्ये सय्यद आबेद रा जांब जि परभणी, महम्मद एजाज शेख लतीफ रा देगलूरनाका नांदेड, अकबर इनामदार रा परभणी यांचा समावेश आहे. तर अन्य एकाचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी त्यांच्याकडून १ कार, तीन मोबाईल, एक लोखंडी सब्बल, बॅटरी, मिरची पूड, दोरी असा एकूण ४ लाख ५९ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. उपनिरीक्षक गंधकवाड पुढील तपास करीत आहेत. त्यांच्या प्राथमिक चौकशी त्यांनी हिंगोली शहरातील आझम कॉलनी भागातील घरफोडीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. सध्या शहर पोलिस आरोपीं-ची कसून चौकशी करीत असून आणखी घरफोड्या उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# कळमनुरीत मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

## ८५ जणांनी केले रक्तदान



**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, २२ जुलै**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय नामदार देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि २२ जुलै रोज मंगळवारी कळमनुरी येथील उपजिल्हा रुग्णालयात रक्तदान शिबिराचे आयोजन कळमनुरी शहर मंडळ व ग्रामीण मंडळा तर्फे आयोजित करण्यात आले होते. ८५ रक्तदात्यांनी या रक्तदानात सहभाग नोंदवून रक्तदान केले. सदरील रक्तदान शिबिर भाजपा जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे व राज्य परिषदेचे सदस्य मा आमदार रामराव वडकुते यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आव-ाहनानुसार त्यांचा वाढदिवस सेवा दिन म्हणून साजरा करण्याचे ठरले होते त्या अनुषंगाने आज कळमनुरी भारतीय जनता पार्टीच्या वतीने कळमनुरी शहर मंडळ व कळमनुरी ग्रामीण मंडळातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सदरील रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी चांगला प्रतिसाद देत जवळपास ८५ रक्तदात्यांनी रक्तदान केले सदरील रक्त संकलनाचे काम वाशीम येथील गजानन रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी केले यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष मा आमदार गजाननराव घुगे व राज्य परिषदेचे सदस्य मा आमदार रामरा-वजी वडकुते जिल्हा उपाध्यक्ष प्रकाशराव नाईक, जिल्हा उपाध्यक्ष सुरेशराव नागरे, वर्षाताई खंदारे राज्य परिषद सदस्या, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष राहुल मेने, तालुका अध्यक्ष विठ्ठलराव भोयर, शहराध्यक्ष ओमकारजी नावडे, उमेश सोमाणी, अमिष दरक, यो-गेश संगेकर, नारायण डुरे, बबन आप्पा पंचलिंगे, संतोष पवार, मुकेश इंगोले, जिद्दी पाटील, पारस मांडवगडे, कैलासराव शिंदे, हनुमंत सूर्यवंशी, विकास जाधव, पुंजाजीराव काकडे, शिवाजीराव मस्के, दौलतराव धनवे, अरुण पतंगे, संजय कोटकर, नागोराव ढाले, माधवराव कोटकर, सुरेश ढेंगळे, ओम प्रकाश शिंदे, सोपान घुगे, शंकर कांबळे, विजयराव निरगुडे, रुखमाराव शिंदे, मसाराव करे, अर्जुन बोरकर, तुकाराम नाईक, राहुल देशमुख, बालाजी काकडे, बाळू घुसे, इनदेश काबरा, सौ शालू डोंगरे, वंदना कांबळे सुनिता कोरडे, मीनाक्षी जमदाडे, रेणुका गिरे, पूनम देवकते, दतराव किरवले, नागोराव बेले यांच्यासह भाजप कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### गवळी समाज संघटनेच्या अध्यक्षपदी राजू यादव



हिंगोली- जिल्ह्यातील गवळी समाजातील गोरगरिबांचे व विद्या-र्थी यांचे वेळोवेळी काम करून जिल्ह्यात त्यांनी आपल्या कामाचा ठसा मारून त्यांनी पुन्हा एकदा अध्यक्षपदी महाराष्ट्र गवळी समाज प्रदेश अध्यक्ष यांनी त्यांची जिल्हा अध्यक्ष पदावर केली आहे. पहिले पाच वर्ष जिल्हाभरात गवळी समाजासाठी काम करून आपल्या कामाचा ठसा उमटवत दि २० जुलै रोजी माजी केंद्रीय मंत्री व भारतीय गवळी समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहिर व महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष हिरामण आप्पा गवळी यांच्या हस्ते जालना येथे महाराष्ट्र राज्य प्रदेश अधिवेशन २०२५ येथे त्यांची हिंगोली जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी दिपक सेठी, हमीद प्यारेवाले, संजय मंदाडे, बाबुराव ढोकणे, गजानन यादव, लक्ष्मण यादव, पवन यादव, सागर यादव, राहुल यादव यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

### सब ज्युनिअर फेन्सिंग राज्यस्तरीय स्पर्धा

हिंगोली- महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हा फेन्सिंग असोसिएशनच्या पुढाकाराने हिंगोली येथे राज्यस्तरीय सब-ज्युनिअर फेन्सिंग स्पर्धेचे आयोजन दि.८ ते १० ऑगस्ट दरम्यान क्रिडा संकुलात तीन दिवशीय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा प्रशासन यांचे सहकार्य आहे. महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा प्रशासन यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यस्तरीय २७ वी सब-ज्युनिअर फेन्सिंग स्पर्धेमध्ये राज्यातील ५०० खेळांडु यांच्यासह पंच, पदाधिकारी हिंगोलीत दि.८ ऑगस्ट रोजी दाखल होणार आहे. गुरुवार दि.२४ जुलै रोजी दुपारी तीन वाजता जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत पुर्व तयारी आढावा बैठक होणार आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी हिंगोली जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष कल्याण देशमुख, सचिव संजय भुमरे यांच्यासह पदाधिकारी, सदस्य याच बरोबर जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार हे परिश्रम घेत आहेत.

### ४६ वाहन चालकांवर कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४६ वाहन चालकांविरूध्द हिंगोली पोलिसांनी कार्यवाही करीत त्यांचेकडून ४१ हजार २५० रूपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच ५ ठिकाणी जुगार अड्ड्यावर धाडी टाकून आरोपीतांविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत.

# अवैध धंदे करणारे तीन गुन्हेगार सहा महिन्यांसाठी हद्दपार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

वसमत शहरात अवैध मटका, जुगारांचे धंदे करणारे तीन सराईत गुन्हेगारांना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश नुकतेच दिले आहेत.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्ह्यात अवैध धंदे करणारे तसेच सराईत गुन्हेगार, टोळीने गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या विरूध्द प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही केली आहे. वसमत शहर पोलिस ठाणे हद्दीत शेख अल्ताफ शेख गौस वय २३ रा गणेशपेठ, मुज्जमील खाँ वहीद खाँ पठाण वय ५६ रा मिर्झा गल्ली, विजय गंगाधर सईम वय ४० रा शिवपूरी यांच्या विरूध्द पोलिस ठाणे येथे अवैध मटका, जुगार व शरिराविरूध्दचे एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. त्यात काही गुन्हे संघटीतपणे दाखल आहेत. त्यांच्या वर्तनात कोणताही बदल होत नसल्याने व त्यांचे अशा गुन्हेगारी प्रवृत्ती व हालचालीमुळे परिसरातील नागरिकांच्या शरीराविरूध्द व मालाविरूध्द धोका उत्पन्न होत असल्याने पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सदर प्रकरणी कडक प्रतिबंध कार्यवाही बाबत आदेश दिल्यावरून पोलिस उपनिरीक्षक एस एस बोंडले यांनी पोलिस निरीक्षक एस एस वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली नमुद आरोपीतांविरूध्द कलम ५५ महाराष्ट्र पोलिस कायद्यान्वये हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाची उपविभागीय पोलिस अधिकारी आंबादास भुसारे यांनी पडताळणी करून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी त्यांना प्राप्त महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ कलम ५५ अन्वये नमुद १० आरोपींना सहा महिन्यांसाठी हिंगोली जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी मागील काही काळापासून जिल्ह्यात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था नांदावी यासाठी सराईत गुन्हेगार व अवैध धंदे करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला असून कोम्बींग व ऑलआऊट ऑपरेशनची नियमित कार्यवाही करण्यात येत आहे.

# हिंगोली जिल्ह्यात मुसळधार पाऊस पुरात अडकलेल्या पुजाऱ्यासह तिघांची सुटका

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**



जिल्ह्यात अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर सोमवारी रात्रीपासून मुसळध-ार पाऊस सुरू झाला. सेनगाव तालुक्यातील बरडा शिवारातील महादेव मंदिरात सरस्वती नदीच्या पुरामध्ये पुजाऱ्यासह तिघ-जण अडकले होते. त्यांना महसूल विभागाच्या पथकने सुखरूप बाहेर काढले आहे.

हिंगोली जिल्ह्यात आतापर्यंत मोठा पाऊस झाला नव्हता मात्र सोमवारी रात्रीपासून जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला. काही ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. या पावसामुळे नदी, नाले दुथडी भरून वाहीले. या पावसामुळे माना टाकणाऱ्या पिकांना नव्याने जीवदान मिळाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

सेनगाव तालुक्यातील बरडा शिवारातून वाहणाऱ्या सरस्वती नदीला पूर आल्याने बरडा शिवारात असलेल्या महादेव मंदिर परिसरात पाण्याची पातळी वाढली. यावेळी मंदिराचे पुजारी शिवेंद्र महाराज आणि शेतकरी सुभाष सानप, काकड महाराज हे पावसामुळे मंदिरात थांगले होते. मात्र पहाटे तीन वाजता सरस्वती नदीला मोठा पूर आल्याने पुराचे पाणी महादेव मंदिरात शिरले. त्यानंतर तिघेही मंदिराच्या छतावर गेले. त्या ठिकाणावरून गावकऱ्यांशी संपर्क साधला. बरडा शिवारात मंदिरात तिघे पुराच्या पाण्यामुळे अडकल्याची माहीती मिळाल्यानंतर माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी तहसील कार्यालय व उपविभागीय अधिकाऱ्यांना माहीती दिली. त्यानंतर आज सकाळी तहसीलदार सखाराम मांडवगडे यांचे पथक दाखल झाले. त्यानी गावकऱ्यांच्या मदतीने दोरीच्या सहाय्याने पुरात अडकलेल्या पूजाऱ्यासह तिघांना सुखरूप बाहेर काढले.

# सेनगाव ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी प्रभाकर गोरे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ जुलै**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या सेनगाव तालुका ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी प्रभाकर गोरे यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी नुकतेच नियुक्तीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार केला आहे. यावेळी बंडू मुटकुळे, गजानन गव्हाणे, अमजद पठाण, दत्ता धामणकर, राम कुंदर्गे, शुभम गवळी, वैभव मगर, गजानन गव्हाणे, अभिषेक मगर, कृष्णा सोनुने, ओमप्रकाश मगर, वैभव इगतकर, विशाल चौधरी, रवि धोतरे, वैभव डोईफोडे, पुष्कर देशमुख, आशिष मगर, करण इगतकर, आदीत्य मगर, धामणे, अतुल मगर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महा रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

# भाजपा नवीन जालना मंडळात ५५ रक्तदात्यांचे अमूल्य योगदान

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दि.२२ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा नवीन जालना मंडळाच्या वतीने भाजपा जिल्हा कार्यालय, संभाजीनगर जालना येथे महा रक्तदान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिक, कार्यकर्ते आणि युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, एकूण ५५ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजसेवेचा आदर्श दिला आहे. यावेळी लोकनेते श्री.रावसाहेब पाटील दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिरात संकलित झालेले रक्त जनकल्याण रक्तपेढी, जालना यांच्या सहकार्याने संकलित करण्यात आले. या महत्त्वपूर्ण उपक्रमाला भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी उपनगराध्यक्ष राजेशजी राऊत, रामेश्वर भांदरगे, विजयजी कामड, सौ. विमलताई आगलावे, नवीन जालना मंडळ अध्यक्ष सुनील भैया खरे, चंपालाल भगत, धनराज काबलिये, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, अर्जुन गेही, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, पूर्व मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे, सिद्धिविनायक मुळे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, सोपन पेंढारकर, कपिल दहेकर, राजेंद्र भोसले, सोमेश काबलिये, देविदास देशमुख, गोवर्धन कोल्हे,



राजेश जोशी, वसंत शिंदे, प्रदीप देठे, शाम उगले, जगदीश यंगूपटला, सुदर्शन काळे, गौरव गोधेकर आदींसह मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी श्री. श्याम पांडुरंग उगले, श्री. प्रतीक सचिन खरात, श्री. सौरभ अंकुश मोरे, श्री. प्रणय गजेश गडगिळे, श्री. हरीश श्रीराम ओझा, श्री. शुभम सुरेश खरगे, श्री. प्रेम संदीप तोडावत, श्री. सौरभ सचिन खरात, श्री. सोमेश चुन्नुलाल काबलिये, श्री. अभिषेक निवृत्ती अस्वले, श्री. विनायक रमेश उजेड, श्री. गणेश दत्तात्रय शेवाळे, श्री. संतोष किसनलाल खंडेलवाल, श्री. संजय भास्कर उगले, श्री. दिलीप पंडितराव केदार, श्री. संदीप किसन कुरे, श्री. मंगेश धनराज सोळुंके, श्री. गणेश उद्धवराव खांडेभराड, श्री. उद्धव देविदास बारबोले, श्री. गणेश उत्तमराव ठाकर, श्री. आकाश तुकाराम निकाळजे, श्री. अमोल संजय चौधरी, श्री. अभिजीत संजय झिने, श्री. आकाश नारायण राठोड, श्री. सय्यद जावेद, श्री. संतोष प्रभाकर बागल, श्री. गजानन भाऊसाहेब शिंदे, श्री. अरविंद रामदास चिरखे, श्री. सुरज गणपतराव शिंदे, श्री. सिकंदर शिव मेहता, श्री. भगवान तुकाराम माथले, श्री. रमेश बाबुराव पवार, श्री. अब्दुल कलाम शेख ताहेर, श्री. अब्दुल कलीम अब्दुल रहीम शेख, श्री. राजेश अशोक गडगिळे, श्री. राजकुमार भास्करराव उगले, श्री. अकबर परसुवाले, श्री. नंदकिशोर कुरधने, श्री. रोहित अरविंद कोल्हे, श्री. किशोर गोविंद राठोड, श्री. अक्षय सिंग, श्री. अजय लक्ष्मण वन्नाल, श्री. रवी प्रकाश पाल, श्री. सोमनाथ बद्रीनारायण उगले, श्री. संतोष रामभाऊ इंगळे, श्री. रवी संपतराव इंगळे, श्री. ज्ञानेश्वर मुरलीधर भोरसड, श्री. गजानन सखाराम ठूणके, श्री. नंदजी सिंग, श्री. मोहम्मद फरमान, श्री. जगदीश नारायण येरकुलकर, श्री. निलेश जिवन गवळी, श्री. अजय बापूराव आडले, श्री. दीपक ब्रिजलाल गेहलोत, श्री. दुरेश प्रकाश राजपूत अशा एकूण ५५ जणांनी रक्तदान केले. या सर्व मान्यवरांनी मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. एक थेंब रक्त - एक जीवनदान या प्रेरणादायी संदेशाने प्रेरित होऊन या शिबिरात अनेकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळातील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले असून, या सर्व कार्यकर्त्यांचे, स्वयंसेवकांचे आणि विशेषतः रक्तदात्यांचे मंडळाच्या वतीने मन:पूर्वक आभार मानण्यात आले.

## संक्षिप्त

### अजितदादा पवारांनी समाजातील विविध घटकांसाठी कल्याणकारी योजना राबविल्या -आ.विक्रम काळे



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा ना.अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्पात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना , शेतीसाठी मोफत वीज, मुलींना मोफत शिक्षण, महात्मा फुले जन आरोग्य योजना मध्ये रुपये पाच लाखापर्यंत वाढ आदी समाजातील विविध घटकासाठी कल्याणकारी योजना करिता अर्थसंकल्पात तरतूद करून त्याचा लाभ मिळवून दिल्याचे आमदार विक्रम काळे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त धारकल्याण तालुका जालना येथील सदानंद महाराज मठ येथे स्व. बाजीराव पाटील चव्हाण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व श्री गणपती नेत्रालय, जालना तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, जालना यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत नेत्र तपासणी, उपचार व चष्मेवाटप शिबिराचे उद्घाटन प्रसंगी आमदार काळे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादीच्या प्रदेश सरचिटणीस शकुंतला कदम, रवींद्र तौर,युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण, महिला जिल्हाध्यक्ष मंगलाताई पाटील, माजी जि प सदस्या पुष्पाताई चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर , शहर कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण म्हणाले की, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण व शरदचंद्र पवार यांचा सहवास लाभलेले अजितदादा पवार यांच्या रूपाने एक दूरदृष्टी असलेले विकासाभिमुख नेतृत्व महाराष्ट्राला लाभलेले आहे. समाजातील सर्व जाती-धर्मातील घटकांना न्याय देणारे व धर्मनिरपेक्ष वृत्तीने काम करणारे नेते असल्याने येणाऱ्या काळात त्यांना मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळावी अशी सामान्य जनतेची भावना असल्याचे ते म्हणाले. आपण वाढदिवस व इतर प्रसंगी गरजवंतांना मदत करण्याच्या मानवतावादी दृष्टिकोनातून नेहमीच समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करीत असून त्यामध्ये कोरोना काळात आयुर्वेदिक औषधी वाटप , धान्य किट, मास्क, सँनिटायझर वाटप, रक्तदान शिबिर, मोफत नेत्र तपासणी शिबिर, शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण आदीं कार्यक्रमाचे नेहमीच आयोजन करत असतो . याप्रसंगी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस शकुंतला कदम व रवींद्र तौर यांनीही मनोगत व्यक्त केले तर प्रदेश युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. या शिबिरात ९९५ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून २५५ रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली आहे त्यांच्यावर श्री गणपती नेत्रालयात मोफत शस्त्रक्रिया होणार आहे. कार्यक्रमास सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे , डॉ. सुखदेव मांटे, तालुका अध्यक्ष कैलास मदन, विधानसभा अध्यक्ष प्रताप शिंदे, शहर महिला जिल्हाध्यक्ष रिंकल तायड,संगीता नागरगोजे, संतोष ढेंगळे, पद्माकर हांडे, विष्णू घुले, दिनकर दराडे, लक्ष्मण कुलकर्णी, विष्णू भुतेकर, उमेश मोहिते ,किशोर सवडे, गणेश डुकरे, सिद्धेश्वर शिंदे , विठ्ठल मोहिते, सुरेखा इंगोले ,राणीताई शिंदे, समाधान राठोड , उपसरपंच बाबासाहेब भुतेकर, दिलीपराव क्षीरसागर ,नवनाथ लोखंडे , विलास भावले, राहुल लष्कर, राहुल कळकुंबे, अमोल खरात , मुख्याध्यापक विलास वायाळ, वसंत घुगे ,प्राचार्य दत्तात्रय नालेगावकर , गणपती नेत्रालयाचे जनसंपर्क अधिकारी संतोष नाईक व स्टाफ , सतीश वाहुळे , शोभा जोगदंड, डॉ.गोविंद वाघ , शेख पप्पू भाई , राहुल राठोड ,शेख समी ,प्रताप लहाने ,ओंकार पडूळ ,रामेश्वर उगले, सोपान शिंदे भगवान उगले ,बालासाहेब उगले, शहाजी मस्के, परमेश्वर कापसे , गणेश धायडे, शेख मोशीन ,दत्तू कुरधने, प्रभाकर भुतेकर, विश्वंभर उगले, अशोक भुतेकर ,संदीप राठोड, विठ्ठलराव उगले , भागवत इंगोले, सतीश ढोबळे ,ऋषिंदर कुरधने, अंकुश वेताळ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी , कार्यकर्ते व रुग्णांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# तळणी मंडळात रेकार्ड ब्रेक पाऊस

## तळणी परिसरात खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील तळणी परिसरात ढगफुटी सारखा मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने खरीप हंगामातील पिकाचे मोठे नुकसान झाले . खास करून नदी काठावरील शेतजमीनी अक्षरशः खरडून गेल्या वळणे फुटली तर अनेक शेतकर्याच्या विहीरीमध्ये मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी शिरल्याने गाळ जाऊन बसला तळणी परिसरात २००६ नतंर पहिल्यांदाच एवढा पाऊस झाला . या वर्षात पावसाळा सुरू झाल्यापासून तळणी परिसरात पिकांना पुरेसा असा पाऊस पडत असल्याने यावर्षी पिकांची परिस्थिती छान होती वेळेवर झालेली पेरणी व पोषक वातावरण निर्माण झाल्याने यंदाचा हगाम हा शेतकर्यावर कृपा करेल असे वाटत असतानाचा मंगळवार च्या रात्री सलग सात तास पडलेल्या पावसाने शेतकर्याच्या स्वप्नावर विरजण पडले .

या एकाच पावसात तळणी परिसरातील छोटे मोठे तलाव पूर्णपणे भरल्या गेले आहेत . तळणी पासून जवळच असलेल्या बेलोरा येथील दोन छोटे तलाव फुटल्याने बेलोरा व वझर सरकटे गावातील शेतीचे नुकसान झाले . विशेष बाब म्हणजे तळणी गावालगतच जाणार्या ओढ्याला कोकरबा शिवारापासून पाणी येऊन मिळते त्यामुळे पाण्याची मोठी आवक या ठिकाणी असते या ओढ्यावरील जवळपास चार ते पाच तलाव भरून वाहिल्याने त्या सर्व तलावाच्या सांडव्याचे पाणी एका सोडण्यात आल्याने सर्व पाणी अनेक शेत जमिनीत असल्याने शेतकऱ्यांचे झाले अनेक शेतर रस्याची दुरावस्था या पावसाने झाली मुख्य पीक सोयाबीन तूर मूग उडीद कपाशी चे मोठे नुकसान झाले विदर्भातून येणारी सरसस्वती नंदीचे पाणी वडगाव सरहद या गावात घुसल्याने ग्रामस्थांना अडचणीचा सामना करावा लागला . सरस्वती नंदीलगतच्या अनेक जमीनी खरडून गेल्या या सर्व शेत जमीनीच्या व पिकांच्या नुकसानीसाठी विशेष पैकेज शासनाने जाहीर करावे अशी मागणी शेतकरी वर्गात होत आहे.

**» मंठा व परतूरच्या दोन्ही तहसीलदारांना पंचनामा** करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत मी स्वःत पाहणी करणार आहे नुकसानीची प्राथमिक माहिती प्राप्त झाली असून यासदर्भात शासना कडे अहवाल सादर करण्यात येईल. **-पद्माकर गायकवाड उपविभागीय अधिकारी परतूर**

“ जिल्हाधिकारी निवासी उपजिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी तहसीलदार या सर्वांना मंठा परतूर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी संदर्भात तातडीने पाहणी करून पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत तसेच झालेल्या नुकसानीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या नुकसानी संदर्भात शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यास प्रयत्न करणार. **- बबनराव लोणीकर आमदार परतूर मंठा**

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना जन्मदिनी रक्तदानातून मानवंदना




**तभा वृत्तसेवा**
**घनसावंगी/प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रेरणेतून संपूर्ण महाराष्ट्रभर महा रक्तदानाचा संकल्प राबविण्यात आला. देवेंद्रजींचा वाढदिवस ‘उत्सव’ म्हणून नव्हे तर ‘उत्तरदायित्व’ म्हणून साजरा करत, घनसावंगी विधानसभा मतदारसंघात समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली तीनही मंडळात भव्य रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरात २२८ भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करत सामाजिक जबाबदारी निभावली.

घनसावंगी तालुक्यात समृद्धी साखर कारखाना येथे भाजपा तालुका अध्यक्ष पुरुषोत्तम उढाण यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. रांजणी (जालना ग्रामीण) येथे मंडळ अध्यक्ष संजय आटोळे यांनी उपक्रम यशस्वीपणे पार पाडला. तर शहागड येथे तालुका प्रमुख शिवाजी मोरे यांच्या वतीने शिबीर घेण्यात आले. या शिबिरास निवडणूक प्रमुख सतीश घाटगे, भाजपा जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायण कुचे यांनी भेट दिली. प्रत्येक ठिकाणी रक्तदात्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. हा विधायक उपक्रम सेवा हीच संस्कृती या भाजपच्या विचारधारेचे जिवंत उदाहरण ठरला आहे. या शिबिरासाठी शहागड घनसावंगी आणि रांजणी मंडळातील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. रक्तसंकलनासाठी जनकल्याण रक्तपेढी व लोकमान्य रक्तपेढीच्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. याबद्दल संपूर्ण टीमचा सतीश घाटगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

## अंबडमध्ये चोरांचे थैमान, नागरिक मध्ये भीतीच वातावरण; पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



अंबड शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरी आणि लुटमारीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दर दोन ते तीन दिवसांनी शहरात कुठे ना कुठे चोरीच्या घटना घडत असूनही पोलिसांकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्याने चोरांचे मनोबल वाढले असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. यामुळे नागरिकांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वी दिवसाढवळ्या एसबीआय बँकेतून एका व्यापाऱ्याचे रु. २,३०,०००/- ची रोकड घेऊन चोरट्यांनी पळ काढल्याची घटना ताजी असतानाच, आता वाहन चोरीच्या घटनांनी डोके वर काढले आहे. १६ जुलै रोजी रात्री दैनिक पुढारीचे पत्रकार रवींद्र कारके यांच्या पाचोड रोडवरील घरासमोरून एम.एच.-१२ डी.एम.-८७०६ क्रमांकाची अल्टो कार चोरट्यांनी पळवली. या घटनेला दोन-तीन दिवस उलटले नसतानाच, १९ जुलै रोजी रात्री २ ते ३ वाजण्याच्या सुमारास शिक्षक कॉलनीमधील शिक्षक अजिनाथ दिनकर शिरसाट यांच्या घरासमोरून एम.एच.२१-बी.एफ.-०९५९ क्रमांकाची मारुती सुझुकी ब्रेझा गाडी चोरीला गेली. या वाढत्या चोरीच्या घटनांमुळे शहरातील नागरिकांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली आहे. पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे चोरांना कोणताही धाक राहिलेला नाही आणि गुन्हेगार बेधडकपणे चोरी करत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. चोरींचे प्रमाण वाढले असून, अद्याप एकाही चोरीचा तपास लागलेला नसल्यामुळे पोलिसांच्या कर्तव्यदक्षतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या गंभीर परिस्थितीकडे पोलीस महानिरीक्षक यांनी तातडीने लक्ष घालून, चोरांचा तपास लावण्यासाठी आणि शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कडक सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवून नागरिकांना सुरक्षितता प्रदान करणे हे पोलिसांसमोरील मोठे आव्हान बनले आहे.

## खोतकरांचा विजवितरण कंपनीवर घणाघात; कॉन्ट्रॅक्टरांनाही घेतले झणझणीत फैलावर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे (बोर्डीकर) जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी आ. खोतकर यांच्या विनंतीवरून महावितरणच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती .सदर बैठकीत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी विजेच्या प्रश्नावर गंभीर स्वरूपाच्या तक्रारी उपस्थित करून महावितरणच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले व त्यांचे एक प्रकारे टाळके ठिकाणावर आणले. जालना शहरातील वीजेच्या समस्या संदर्भात आपण विधानसभा सभागृहात देखील प्रश्न उपस्थित केला होता तरी देखील अधिकाऱ्यावर काहीच फरक पडत नाही शहरातील वीज दिवसातून ५० वेळा जात असून याकडे अधिकारी सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात. यामुळे जनतेचा रोष आम्हा लोकप्रतिनिधीला सहन करावा लागतो. महावितरणचे करोडो रुपयांचे कामे होऊन देखील विजेची समस्या दूर झालेले नाही .यामध्ये अधिकारी व संबंधित एजन्सी यांची हात मिळवणी असून त्यांनी या कामांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केलेला आहे. सदर कामाची चौकशी करून कारवाई करण्यात यावी. तसेच यापुढे कामे करताना लोकप्रतिनिधिंना विश्वासात न घेणे, कामाचा दर्जा अत्यंत निष्कृष्ट दर्जाचा असणे, आवश्यक ठिकाणी काम न करता काही ठराविक लोकप्रतिनिधीच्या मर्जीप्रमाणेच काम करणे ,अंदाज पत्रकाच्या बाहेरची कामे करणे, जुनीच कामे नव्याने दाखवणे , अशा



गंभीर स्वरूपाचे प्रश्न आमदार खोतकर यांनी उपस्थित करुन ऊर्जा राज्यमंत्री बोर्डीकर यांच्यासमोर आक्रमकपणे प्रश्न मांडले व अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले एवढे धारेवर धरून ही जर हा प्रश्न कायम राहिला तर आम्ही वेगळ्या पद्धतीने तुम्हाला सळो की पळो करुन सोडू. असा गर्भीत इशारा दिला. जर काम करत नसाल, तर परिणाम भोगावे लागतील. यावेळी त्यांनी काही ठेकेदारांनाही फटकारले आणि विकासकामांत प्रामाणिकपणा व वेळेवर काम करण्याचे निर्देश दिले. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना यावर कठोर कारवाईसाठी स्पष्ट सूचना देत, महावितरणने आपल्या कार्यपद्धतीत तातडीने सुधारणा कराव्यात, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला. या बैठकीनंतर जालना जिल्ह्यातील वीजविषयक प्रश्नांवर सकारात्मक हालचाल होण्याची अपेक्षा आहे.

# पत्रकारांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा उपयोग करणे आवश्यक -जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

## जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते पत्रकार कार्यशाळेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आजच्या स्पर्धेच्या युगात पत्रकारांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा आपल्या दैनंदिन कामकाजात उपयोग करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसुल सभागृहात आज जिल्हास्तरीय पत्रकार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ हे बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी.एम. पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल तर प्रमुख मार्गदर्शक जालना येथील शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे संगणक



विभागाचे वरिष्ठ श्रेणी प्राध्यापक प्रा. संदिप काळे, जिल्हाधिकारी कार्यालयातील (संगायो) विभागाच्या तहसिलदार श्रीमती प्रणाली तायडे आणि जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, आज प्रत्येक क्षेत्रात एआयचा मोठ्या प्रमणात वापर होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे पत्रकारांनी देखील नवीन येणारे तंत्रज्ञान आत्मसात करणे ही आज काळाची गरज बनली आहे. प्रत्येकाला आज बातमी लवकरात-लवकर हवी असते. परंतू कोणतीही बातमी प्रसिध्द करण्यापुर्वी पत्रकारांना त्याची सत्यता देखील पडताळून पाहणे आवश्यक आहे. आज मोबाईल आणि एआयच्या युगामध्ये प्रत्येकाकडे बातमी असून, प्रत्येक व्यक्ती हा बातमीचा कन्टेंट तयार करु शकतो. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पत्रकारांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापर करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) पत्रकारितेवर अनेक प्रमुख मार्गांनी परिणाम करत आहे. त्यामुळे एआयचा वापर कशा प्रकारे करावा हे पत्रकारांनी समजावून घेणे आवश्यक आहे.

तसेच आजच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये आपणा सर्वांना विविध ताण-तणावांना सामोरे जावे लागत आहे. याकरीता आज आपणास जिल्हा माहिती कार्यालयाने आयोजित केलेल्या कार्यशाळेच्या माध्यमातून दोन महत्वाच्या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन मिळणार असुन, या प्रशिक्षणाचा आपणास नक्कीच आपल्या दैनंदिन जीवनात उपयोग होणार असल्याचे ही डॉ. पांचाळ यावेळी म्हणाले.

पोलीस अधिक्षक श्री. बन्सल मार्गदर्शन करतांना म्हणाले की, एआयचा वापर चांगल्यारितीने केल्यास त्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात निश्चितच फायदा होणार आहे. सध्या पत्रकारितेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर हा पैसा आणि वेळ वाचविण्यासाठी होत असून, वेग आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी देखील त्याचा उपयोग केला जात आहे. नियमित रिपोर्टिंग स्वयंचलित करून, येणाऱ्या समस्या जलद गतीने कमी करून कृत्रिम बुद्धिमत्ता सद्याच्या पत्रकारितेवर परिणाम करत आहे. परंतु एआयचा वापर करतांना पत्रकारांनी बातमीची खात्री करुन घेणे देखील आवश्यक आहे .

## संक्षिप्त वृत्त...

### येलदरी जलाशयात ५४.३४ टक्के जिवंत पाणीसाठा

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाच्या येलदरी जलाशयात सोमवार २१ जूलै रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत ५४.३४ टक्के एवढा जिवंत पाणीसाठा उपलब्ध होता.

या प्रकल्पाची १२४.६७० दशलक्ष घनमीटर मृत पाणीसाठ्याची, ८०९.७७० जिवंत पाणीसाठ्याची व ९३४.४४० दशलक्ष घनमीटर पाणीसाठ्याची क्षमता आहे. सोमवारी सकाळी ८ वाजेपर्यंत या प्रकल्पात १२४.६७० मृत पाणीसाठा, ४४०.०५७ जिवंत पाणीसाठा व ५६४.७२७ दशलक्ष घनमीटर एकूण पाणीसाठा उपलब्ध होता. प्रकल्पाची ४५७.६९० मीटर पाणी पातळी होती. मागील चोवीस तासात या प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात ०.१८४/४३.९५२ दशलक्ष घनमीटर एवढी पाण्याची आवक झाली. सद्यस्थितीत प्रकल्पात ५४.३४ टक्के जिवंत पाणीसाठा उपलब्ध आहे. यावर्षी एकूण १७६ मिमी एवढा पाऊस नोंदविला गेला आहे, अशी माहिती पाटबंधारे खात्याच्या अधिकार्यांनी दिली.

### पेडगांवच्या ग्रामपंचायतीचे झेडपीच्या सीईओंना साकडं

#### पेडगाव रस्ता ते रेल्वे स्टेशन रस्ता भयावह अवस्थेत : दुरुस्तीची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ते मानवत या राष्ट्रीय महामार्गावरील पेडगांव फाटा ते पेडगांव रेल्वेस्थानकापर्यंतच्या रस्त्याची अवस्था अक्षरशः भयावह झाली असून जिल्हा परिषद प्रशासनाने या रस्त्याच्या मजबुतीकरणासह डांबरीकरणाचे काम तातडीने सुरु करावे, अशी मागणी पेडगांव ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सोमवारी सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या रस्त्यावरुन मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थांची ये-जा आहे. परंतु, रस्ता पूर्णतः उखडला आहे. आदळ आपट केल्याशिवाय वाहनधारकांना पर्याय उरला नाही. या स्थितीत वाहनधारक रस्त्याऐवजी रस्त्याच्या बाजूने जीव मुठील घेवून ये-जा करीत आहेत. पावसाळ्यात तर काळ्या मातीतून ये-जा करतांना वाहनधारकांना मोठ्या कसरतील कराव्या लागत आहेत. या स्थितीची आपण दखल घ्यावी व तातडीने रस्त्याच्या मजबुतीकरणाचं काम सुरु करावं, अशी मागणी सरपंच श्रीमती सविताबाई अशोकराव हरकळ, उपसरपंच सौ. राजश्री गोपाळराव देशमुख व ग्रामविकास अधिकारी नितीन पवार यांनी या निवेदनाद्वारे केली आहे.

### पूर्णा नगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीचाच झेंडा फडकवू

#### ज्येष्ठ नेते माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांचा विश्वास

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा नगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीचाच झेंडा फडकवूया असा संकल्प भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टीच्या पूर्णा शहर व तालुक्याच्या संघटनात्मक बांधणीच्या दृष्टीने पूर्णा बाजार समितीच्या सभागृहात रविवारी व्यापक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी माजी आमदार बोर्डीकर यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. जिल्हाध्यक्ष सुरेश भूमरे यांच्यासह अन्य स्थानिक पातळीवरील नेते व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. यावेळी माजी आमदार बोर्डीकर यांनी राज्य व केंद्र सरकारच्या अनेक लोकप्रिय योजना सर्वसामान्य नागरीकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, त्यासाठी कार्यकर्त्यांनी जागरुक असले पाहिजे तरच या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावनी होईल, असा विश्वास बोर्डीकर यांनी व्यक्त केला. दरम्यान, यावेळी अन्य मान्यवरांचीही भाषणे झाली.

### परिचारिकांचा बेमुदत संप, रुग्णालयातील रुग्णसेवेचे काम विस्कळीत

**परभणी,/प्रतिनिधी :** आपल्या विविध मागण्यांकरीता राज्य परिचारिका असोसिएशनने पुकारलेल्या बेमुदत राज्यव्यापी संपात शुक्रवारपासून (दि.१८) परभणी जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील सर्व परिचारिका सहभागी झाल्या आहेत. दरम्यान, संपाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी रुग्णालयातील रुग्णसेवेचे कामकाज पूर्णतः कोलमडले.

मुंबई येथील आझाद मैदानावर राज्य परिचारिका असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह अन्य आपल्या मागण्यांकरीता १४ व १५ जूलै रोजी धरणे आंदोलनास बसले होते. परंतु, या आंदोलनकर्त्यांकडे राज्याच्या आरोग्य विभागाने फारसे लक्ष दिले नाही, त्यामुळे १७ जूलै रोजी या संघटनेने एक दिवस कामबंद आंदोलन केले. तरीसुध्दा सरकारने दुर्लक्ष सुरुच ठेवल्यानंतर १८ जूलै पासून राज्यव्यापी कामबंद आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे शुक्रवारपासून शासकीय रुग्णालयातील परिचारिका बेमुदत संपावर गेल्या आहेत.

दरम्यान, परभणी जिल्ह्यातील १२२ परिचारिका संपावर गेल्या असून त्यामुळे रुग्णसेवेचे कामकाज पूर्णतः ठप्प झाल्याची माहिती सरकारी सूत्रांनी दिली.

### पिंगळीतील महाआरोग्य शिबिरातून दोन हजार रुग्णांची तपासणी

**परभणी,/प्रतिनिधी :** आमदार डॉ. राहुल पाटील यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने पिंगळी येथील गोकुळनाथ विद्यालयात शनिवारी (दि.१९) आयोजित केलेल्या मोफत सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया तपासणी शिबीरात दोन हजारहून अधिक गरजू रुग्णांची तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात आर. पी. हॉस्पिटल येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने विविध प्रकारच्या आजारांची तपासणी केली. यामध्ये हृदयरोग, कर्करोग, त्वचारोग, डोळे आणि कान-घसा विकार, अस्थिविकार, मधुमेह, मेंदूविकार, स्त्रीरोग, मानसिक आरोग्य, मूत्रविकार, शोषणाचे विकार, प्लास्टिक सर्जरी, दंतरोग आणि लठ्ठपणासारख्या अनेक आजारांचा समावेश होता.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# लॉयन्स क्लबला हॉस्पिटल उभारण्यासाठी जागा देणार

## लायन्स पदग्रहण समारंभात आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांची ग्वाही

**गंगाखेड/प्रतिनिधी-** जनतेला आरोग्य विषयक सेवा मोफत पुरविणाऱ्या, व जागतिक स्तरावर सामाजिक कार्य मोठ्या प्रमाणात करणाऱ्या लॉयन्स इंटरनॅशनल च्या लायन्स क्लब गंगाखेड या संस्थेला हॉस्पिटल उभारणीसाठी दहा हजार स्क्वेअर फुट जागा उपलब्ध करून देणार असे प्रतिपादन, प्रमुख मार्गदर्शक- आमदार डॉक्टर रत्नाकरराव गुट्टे यांनी लायन्सच्या पदग्रहण समारंभ प्रसंगी बोलताना केले.

लॉयन्स क्लब गंगाखेड टाऊन च्या नूतन कार्यकारणीचा शपथ ग्रहण समारंभ येथील राजेश्वर फंक्शन हॉलमध्ये संपन्न झाला, याप्रसंगी व्यासपीठावर माननीय साहेबराव भोसले सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, माननीय किशनराव भोसले माजी जिल्हा परिषद सदस्य, बाबासाहेब जामगे झोन चेअर पर्सन, विठ्ठलराव सूर्यवंशी मा. सभापती, जि. प. परभणी, डॉक्टर के पी गारोळे हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. लॉयन एडवोकेट रावसाहेब वडकिले -अध्यक्ष,लॉयन महादेव गीते- सचिव व लायन माऊली शिंदे- कोषाध्यक्ष यांना त्यांच्या पदाची जबाबदारी समजावून सांगून त्यांना नवीन वर्षाचा पदभार उपप्रांतपाल,पीएमजेएफ योगेश कुमार जयस्वाल,यांच्या हस्ते देण्यात आला. तसेच नूतन कार्यकारणी - संजयशेठ दुधाटे, संभाजी वाडेवाले, डॉक्टर किशोर कुगणे, ज्ञानेश्वर राजुरकर, अनिल डोंगरे,प्रभाकर देशमुख,प्राचार्य बालाजी ढाकणे, रामेश्वर तापडिया, प्रा. डॉ. राजीव आहेरकर,दगडूशेठ सोमानी, केशव देशमुख,विठ्ठल प्रसाद पवार या मान्यवरांची अधिकृत पदस्थापना करण्यात आली.




नवीन सदस्यांना लायन्स क्लबचे सदस्यत्व देण्यासाठी जालना येथून, एमजेएफ सुनील बियाणी- यांना निमंत्रित केले होते. डॉक्टर पाराजी सोळंके डॉक्टर मंगेश शिरसाट प्रल्हाद श्रीहरी मुंडे रावसाहेब कचरे रामराव मुरकुटे एडवोकेट मिलिंद क्षीरसागर साहेबराव केंद्रे महेंद्र भंडारी संदीप जाधव चक्रधर शिंदे शत्रुघ्न निरास रमजान भाई कुरेशी रामराव चाटे या मान्यवरांना, सामाजिक सेवा करण्यासाठी,लॉयन्स इंटरनॅशनल चे सदस्यत्व देण्यात आले .

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, लॉयन हरिश्चंद्र राठोड, नंदकुमार भरड,संजय तापडिया,डॉ. धुमाळ दत्तात्रय निलपत्रेवार,बालाजी कांदे,डॉ.बालासाहेब मानकर, डॉ.ज्ञानोबा तुरनर, डॉ.सुरेश सूर्यवंशी,विनायक दीडशेरे, प्रा.यू आर कुलकर्णी, ज्ञानेश्वर कापसे कुबेर खांडेकर, आळनुरे, बालाजी टेकाळे, शिवराज मुंडे नाथराव चाटे इत्यादींनी परिश्रम घेतले.

गंगाखेड मध्ये अनेक प्रकारच्या आरोग्य सुविधा लॉयन्सच्या माध्यमातून मोफत उपलब्ध करून दिल्या जातील, शहराचे पर्यावरण चांगले राहण्यासाठी वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम लायन्स सदस्यांना सोबत घेऊन, राबविली जाईल , अशी ग्वाही अध्यक्षपदाची सूत्र हाती घेतल्यानंतर एडवोकेट रावसाहेब वडकीले यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल प्रसाद पवार यांनी तर आभार केशव देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीता नंतर स्नेहभोजनाने झाली.

### अवैध रेती उपसा करणारे दोन तराफे नष्ट; स्थागुशा पथकाची धडक कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी :** पालम पोलीस स्टेशनच्या हद्दीतील फळा गावाजवळील नदीपात्रात अवैधरित्या रेतीचा उपसा करणारे दोन तराफ स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने जप्त करून नष्ट केले.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली, अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईत स्थागुशाचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, पालम पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पी. डी. भारती, पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंह परिहार तसेच पोलीस अमलदार परसराम गायकवाड, दिलीप निलपत्रेवार आणि लक्ष्मण कांगणे यांनी सहभाग घेतला. दरम्यान, नदीपात्रातून बेकायदेशीर पद्धतीने रेती उपसा करणाऱ्यांविरुद्ध अशी कारवाई सुरूच राहील, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे. या कारवाईमुळे रेती माफियांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सेलू तालुक्यात दमदार पाऊस, नदीनाल्यांना आला पूर, प्रवासी वाहतूक सेवा विस्कळीत

**सेलू,/प्रतिनिधी:** मागील अनेक दिवसांच्या उघाडी नंतर १७ जूलै रोजी सेलू तालूक्यातील चार मंडळात अतिवृष्टी झाली होती.त्यानंतर २१ जूलै च्या मध्यरात्री संपूर्ण तालूक्यात सूरू झालेला दमदार पाऊस २२ जूलै मंगळवार सकाळी ९वाजेपर्यंत सूरूच होता त्यामूळे तालूक्यातील दूधना,कसूरा व करपरा नद्यांना पूर आल्यामूळे मंगळवारी दिवसभर तालूक्यातील प्रवासी वाहतूक विस्कळीत झाली होती.सोमवारी मध्यरात्री पासून मंगळवारी सकाळपर्यंत तालूक्यात सरासरी ५३.०६ मीमी पावसाची नोंद झाली आहे तर चिकलठाणा मंडळात सर्वाधिक ८७.८ मी.मी.,मोरेगाव मंडळात ७९.३ मी.मी.,वालूर ४३.६ मी.मी.,देऊळगाव गात ३६.३ मी.मी.तर सर्वाधीक कमी कूपटा मंडळात २३.८ मी.मी.इतकी पावसाची नोंद झाली आहे. तालूक्यात दूस-यांदा दमदार पाऊस पडल्यामूळे तालूक्यातील सर्वच नद्या दूथडी भरून वाहू लागल्या सेलू -पाथरी दरम्यान असणारी कसूरा नदीवरील कूंडी येथील पूलावरून मंगळवारी सकाळी ११:३० वाजता पाणी वाहू लागल्यामूळे सेलू -पाथरी दरम्यानच्या एस.टीच्या ७ फे-या रद्द झाल्या त्याशिवाय पाथरी आगारातून सेलूकडे येणा-या एस.टी. न आल्यामूळे तालूक्यातील इतर ठिकाणच्याही फे-या रद्द करव्या लागल्या तसेच सेलू -वालूर दरम्यान राजवाडी येथून दूधना नदीचे पाणी पूलावरून वाहू लागल्याने राजवाडी -वालूर वाहतूक ७:४५ पासून बंद झाली होती.त्यामूळे एस.टीच्या १० फे-या रद्द करण्यात आल्या तसेच मोरेगाव -वालूर रस्त्यावरील साळेगाव खडकी पूलावरून पाणी असल्याने वाहतूक बंद होती. कसूरा नदीचे पाणी पूलावरून वाहू लागल्यामूळे सकाळी ८ वाजल्यापासून सातोना -आष्टी रस्ता बंद असल्याने एस.टीच्या ४ फे-या रद्द करण्यात आल्या. करपरा नदीमूळे नांदरा-डासाळा- आष्टी रस्ता बंद असल्याने एस.टीच्या ६ फे-या रद्द करण्यात आल्या असल्याची माहिती महामंडळाकडून देण्यात आली.



पिके पाण्याखाली

अनेक दिवसाच्या प्रतिक्षेनंतर १७ व २२ जूलै रोजी तालूक्यात अतिवृष्टी सह दमदार पाऊस झाल्याने शेतक-यावरील दूष्काळाचे संकट टळले मात्र त्याच बरोबर दोन्ही पावसामूळे नदी काठावरील शेतक-यांच्या शेतातील पिकात पाणी जावून शेतक-यांच्या पिकांचे मोठे नूकसान झाले २२ जूलै रोजी झालेल्या पावसामूळे तासूक्यातील साळेगाव येथील तूकाराम विठ्ठल गायके यांच्या गट.क्र.१२३ मधील शेतातील दूधना प्रकल्पावरील शेतचारी फूटून पावसाचे पाणी शेतात शिरल्यामूळे शेताला नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते.यामूळे शेतातील सोयाबीन चे पिक व माती वाहून गेल्याने शेतक-याचे आर्थीक नूकसान झाले आहे.त्यामूळे नदी काठावरील नूकसानग्रस्त शेतक-यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून सर्व बाधीत शेतक-यांना तात्काळ नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

### पोखरणी येथील शिक्षकाचे गावकऱ्यांनी केले कैतुक

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील पोखरणी येथील मुख्याध्यापक श्री बोचरे सर यांचे पोखरणी येथील गावकऱ्यांनी



केले कौतुक केंद्रीय प्राथमिक शाळा एक ते चार वर्गपर्यंत शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे शिकविण्याचे काम करीत आहे तसेच सकाळी त्यांना शाळेतच वर्ग घेतात व रात्री सुद्धा शाळेतच वर्ग घेतात यामुळे पोखरणी येथील विद्यार्थ्यांचे जे विद्यार्थी शाळेत येत नव्हते ती विद्यार्थी सुद्धा आज श्री बोचरे सर यांच्यामुळे शाळेत येतात श्री बोचरे सर हे रात्री शाळेतच मुक्काम राहतात मुक्काम राहिल्यामुळे सर्व विद्यार्थी व पालकांना आनंदाचे वातावरण निर्माण होत आहे त्यांच्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना काहीही येत नव्हते ती विद्यार्थी आज शाळेत अभ्यास करत आहात यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यात कुठेही अंधारात राहता येणार नाही त्यांच्यामुळे अंधारातून उजेडाकडे येण्याचे स्वप्न विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेले आहे पोखरणी हे गाव जिंतूर ते औंढा रोड पासून पाच किलोमीटर अंतरावर आहे अत्यंत डोंगराळ भागात गाव असल्यामुळे या ठिकाणी कुठलीही सुविधा नसताना श्री बोचरेसरांमुळे गावातील स्वच्छता व विद्यार्थ्यांना चांगले वळण लावण्याचे काम हे करीत आहेत त्यामुळे गावात शाळेतच मुक्कामाला राहून अभ्यासिका घेतात त्यांची तळमळ शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांविषयी खूप आहे त्यांच्या कामगिरीमुळे गावातील महिला पुरुष यांच्यामध्ये खुशीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

त्यामुळे त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने केंद्रीय प्रथमिक शाळा पोखरणी येथे गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी पोखरणी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपचे ज्येष्ठ नेते सुधाकरराव जाधव श्री सूर्यवंशी ग्रामसेवक भाकरे सर व गावातील नागरिक यावेळी उपस्थित होते.

# हदगाव बुद्रुकला अतिवृष्टी आणि पुराचा तडाखा; सभापती नखाते सह प्रशासनाचे तातडीचे मदतकार्य सुरू

**पाथरी,/प्रतिनिधी:** पाथरी तालुक्यातील हदगाव बुद्रुक येथे मंगळवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि ओसंडून वाहणाऱ्या लेंडी नदी व दोन्ही नाल्याच्या पाण्यामुळे इंदिरानगर भागातील सर्व घरे आणि जिल्हा परिषद शाळा तीन ते चार फूट पाण्यात गेली आहेत. यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान सभापती नखाते सह प्रशासनाने तातडीचे मदतकार्य सुरू केले आहे.

हादगांव बुद्रुक येथील पूरपरिस्थितीची माहिती मिळताच घटनास्थळी बाजार समितीचे सभापती अनिलराव नखाते हे तहसीलदार एस.एन. हंडेश्वर, पोलीस निरीक्षक महेश लांडगे,अजिंक्य नखाते,तलाठी आर.के. कोल्हे,ग्रामसेवक कुलदिप फंड,नागोराव पवार, चेअरमन बाबासाहेब नखाते, ग्रा.प.सदस्य बि.टी.कदम,शेख अशपाक,न.फ.पाथरीचे अग्निशमन पथक हे पहाटेपासूनच मदतीसाठी तैनात आहेत. नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचे काम जलद गतीने सुरू असून, प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.घडलेल्या नुकसानीची माहिती आमदार राजेशदादा विटेकर यांना देण्यात आली असता त्यांनी कृषी आणि महसूल प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत, जेणेकरून नागरिकांना मदतीचा लाभ लवकर मिळू शकेल.सभापती अनिलराव नखाते यांचे दक्षतेने आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज झिल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे. रेणाखळी आणि किन्होळा,वरखेड या परिसरातील दोन्ही नाले अरुंद हा हादगांव बु.परिसरात लेंडी नदिला संगम पावतो त्यामुळे दरवर्षी थोडासा पाऊस जरी झाला तरी पूरस्थिति उद्भवते व नागरिकांचे हाल होतात. त्यामुळे या लेंडी नदिसह दोन्ही नाल्याचे दोन्ही बाजुने दोन - दोन किलोमीटर खोलीकरण व सरळीकरण करणे अत्यावश्यक असल्याचे सभापती अनिलराव नखाते यांनी तहसीलदार हंडेश्वर यांना सांगितले.



# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात महारक्तदान







**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२२ जुलै -**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२२ जुलै रोजी जिल्ह्यात ठिक ठिकाणी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

**माहूर ग्रामीण रुग्णालयात रक्तदान शिबिर व फळ वाटप कार्यक्रम**

**माहूर**-राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार या दोघा मोठ्या नेत्यांच्या वाढदिवसाच्या दुग्धशर्करा योगावर माहूर येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात भारतीय जनता पार्टी तालुका माहूर व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका माहूर यांच्या संयुक्तविद्यमाने

भव्य रक्तदान शिबिर व रुग्णांना फळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ५६ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले. आज २२ जुलै रोजी सकाळी १०:०० वाजता रक्तदान शिबीराचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर यांच्या हस्ते तथा श्री रेणुकादेवी संस्थानचे विश्वस्त संजय काण्णव, वैद्यकीय अधिक्षक डॉ. किरणकुमार वाघमारे, पोलिस निरीक्षक गणेश कराड, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक गोपू महामूने, भाजपचे ज्येष्ठ नेते तथा रुग्ण कल्याण समिती सदस्य अनिल वाघमारे,भाजप तालुकाध्यक्ष निळकंठ मस्के, राकाँ.तालुकाध्यक्ष अमित राठोड,भाजप माजी तालुकाध्यक्ष कांतराव घोडेकर या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. दुपारी ०४:०० वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात तालुका व परिसरातील एकूण ५६ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केले.

याप्रसंगी भाजयुमो प्रदेश सचिव संदीप राठोड, नंदकुमार जोशी, विजय आमले, नंदकुमार कोलपवार,विलास पाटील चौधरी, विनायक मुसळे, अविनाश भोयर,राकाँ.शहराध्यक्ष संतोष अग्रवाल, डॉ.मेंडके,श्याम कुमरे, अशोक जोशी, पद्माताई गिऱ्हे,स्वाती आडे, अर्चना दराडे,प्रतिभा पाटील,

जयकांत मोरे,विशाल खरे,किशोर आत्राम, निलेश तायडे,पवन चौहान, कैलास फड,अपील बेलखोडे, निलेश जयस्वाल,अजय पवार, मनीष राठोड, संजय राठोड,फिरोज खान पठाण यांच्यासह दोन्ही पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मान्यवरांच्या हस्ते ग्रामीण रुग्णालयात उपस्थित रुग्णांना विविध फळांचे वाटप करण्यात आले.

**मुदखेड येथे भव्य रक्तदान शिबिर**

**मुदखेड**-महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२२ जुलै रोजी मुदखेड भाजपा च्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार व खा.अशोक चव्हाण तसेच भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजया चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड शहरातील वीरशैव गवळी समाज सभागृहात भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मुदखेड शहर भाजपाच्या वतीने करण्यात आले.

यावेळी भाजपा नांदेड जिल्हा अध्यक्ष उत्तर किशोर देशमुख,भाजपा शहर अध्यक्ष रामसिंग चव्हाण,जिल्हा महामंत्री प्रविण गायकवाड, माजी नगराध्यक्ष सुनील शेट्टे, माधव पाटील कदम,संजय सोनटक्के,संजय आऊलवार,प्रविण काचावार,उत्तम चव्हाण, राजु बारतोंडे, कालीदास जंगीलवाड,राम आबादार, मुन्ना चांडक,प्रभाकर पांचाळ,रावसाहेब चौदंते, देवा धबडगे,गजानन कमळे, संतोष सावंत, सुशील मुंगल, माधव वाघमारे,सुधाकर सूर्यवंशी,विनोद चंद्रे, ऋषिकेश पारवेकर, राहुल चिंतेवाड,मुन्ना कांबळे, मधुकर दवणे,रतन चौदंते,संजय चव्हाण, ईश्वर पिन्नलवार, अविनाश चव्हाण,उत्तम गीरी,शिवा तोटेवाड, शैलेश गुडमलवाड, प्रियंका खंदारे, शैलेश बोडके, अभिजीत नातेवाड, पिंटू ठाकूर,यासह आदि भाजप कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

**किनवट येथे ९० रक्तदात्यांचे योगदान**

**किनवट**-भारतीय जनता पक्ष शहर मंडळाच्या वतीने, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, तथा आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

साईबाबा मंदिर, किनवट येथे आज सकाळी १० वाजता या सामाजिक उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. शिबिरात एकूण ९० रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करत सामाजिक कर्तव्य निभावले.

या कार्यक्रमाचे संयोजन शहर मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांनी केले होते. शिबिरात तालुका व शहरातील विविध भाजप पदाधिकारी, बूथप्रमुख, शक्तीप्रमुख आणि शेकडो कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

प्रमुख उपस्थितीत : कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ नेते सुधाकर भोयर दिनकर चाडावार, राघू मामा, आनंद मच्छेवार, श्रीनिवास किशनराव नेम्मानीवार, व्यंकटराव नेम्मानीवार, संदिप केंद्रे, अजय चाडावर, नारायण सिडाम, तुकाराम पेंदोर, प्रकाश टरपे, संतोष चनमनवार, पुनम दिक्षित, सुरेश सोळंके आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची वैशिष्ट्ये : रक्तदान करणाऱ्यांमध्ये बाळकृष्ण कदम, सुनिल मच्छेवार, सतिष बिराजदार, विश्वास कोल्हारीकर, जयराज वर्मा, राजेंद्र भातनासे, नरसिंग तक्कलवार, बाबूलाल जाटवे, आकाश भंडारे, राहूल दरगुलवार, जगदीश तिरमनवार, कृष्णा इटकेपेल्लीवार, शिवा क्यातमवार, कृष्णा कलकुंटलावार, शिवा आंधळे, शंकर भंडारे, अक्षय पावडे, संतोष कन्नाके, संतोष मरस्कोल्हे, विद्याताई पाटिल, गंगुबाई परेकार, अरबाज लाला, राम शेपुरवार, बालाजी धोत्र, सागर पिसारीवार, नरेश सिरमनवार, विक्रांत दग्गुलवार, मनोहर श्रिरामे, आकाश पवार, माज बडगुजर, गौरव इटकेपेल्लीवार, निखील कावळे आदी कार्यकर्त्यांचा समावेश होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वास कोल्हारीकर यांनी अतिशय नेटकेपणे पार पाडले, तर आभारप्रदर्शन बाळकृष्ण कदम यांनी केले. या कार्यक्रमात 'रक्तदान करा, जीवन वाचवा!' या घोषवाक्याच्या माध्यमातून सामाजिक जागरूकतेचा सकारात्मक संदेश देण्यात आला. संपूर्ण शिबिराचे आयोजन अत्यंत यशस्वी व शिस्तबद्ध रितीने पार पडल्याने उपस्थित मान्यवरांनी संयोजक व भाजप कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक केले. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी जपण्याचा भाजपाचा संकल्प अधिक दृढ झाला असून, भविष्यात अशा उपक्रमांद्वारे जनतेच्या सेवेचे कार्य अविरत सुरू राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**धनेगाव येथे भव्य रक्तदान शिबिर**

**नवीन नांदेड** -महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महा रक्तदान या संकल्पनेतून नांदेड दक्षिण ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांच्या वतीने धनेगाव ग्रामपंचायत समोर दिनांक २२ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता भव्य रक्तदान शिबिराच्या माध्यमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

नांदेड दक्षिण ग्रामीण मंडळाच्यावतीने दिनांक २२ जुलै रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व नांदेड महानगर अध्यक्ष अमर भाऊ राजूरकर यांच्या उपस्थितीत माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे व विश्वांभर पाटील शिंदे यांच्या वतीने रक्तदान शिबिर धनेगाव ग्रामपंचायत च्या समोर सकाळी ९ वाजता घेण्यात आले. नांदेड ब्लड सेंटर बँकेने रक्त संकलनाचे काम केले यावेळी परिसरातील रक्तदात्यांनी १०१ बॅग रक्त देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच वाढदिवस साजरा करण्यात आला.यावेळी अमर राजुरकर,संजय कोटगे, माझी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे ,गंगाधर पिंटू पाटील सरपंच,

गणेशराव पाटील शिंदे, रमेश वाघमारे, तातेराव ढवळे, जयप्रकाश येवले, माधव देशमुख, सुरेश शिंदे, गंगाधर देशमुख, शैलेंद्र ठाकूर, डॉ. अमित रोडे, निलेश भालके, गंगाधर देशमुख, गंगाप्रसाद काकडे, गोपीचंद धनेगावकर, स. युसुफ स मयनोदीन, बळी शिंदे यांच्या सह शेकडो रक्तदात्यांची, कार्यकर्ते व गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

**महाराष्ट्रचे मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन**

**हिमायतनगर**-हिमायतनगर शहरातील भारतीय जनता पार्टी वतेने दि.२२ जुलै रोजी परमेश्वर मंदिर प्रांगणात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन तालुका अध्यक्ष गजानन चायल यांनी

महाराष्ट्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित केले. यावेळी जिजाऊ बल्ड बॅक व गोवळकर गुरुजी रक्तदाकेंद्र नांदेड यांनी या रक्तदान शिबिरास सहकार्य केले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त आज हिमायतनगरासह विविध ठिकाणी भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि नागरिकांनी पुढाकार घेत या सामाजिक उपक्रमात सहभाग घेतला. गरजू रुग्णांना रक्ताचा पुरवठा होण्यास मदत करण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या शिबिरांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शहरांमध्ये आणि ग्रामीण भागांतही रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली होती. अनेक ठिकाणी भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने रक्तदान करण्यासाठी उपस्थित होते. ब्लड बँक कर्मचाऱ्यांनी रक्त संकलनाचे काम केले.

यावेळी बोलताना भाजपाचे तालुका अध्यक्ष गजानन चायल यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब नेहमीच सामाजिक कार्याला प्राधान्य दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरांचे आयोजन करून, आम्ही समाजाप्रती आपली बांधिलकी व्यक्त करत आहोत. यातून जमा झालेले रक्त अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचवेल. यावेळी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

**कंधारकरांनी रक्तदानातुन दिल्या मुख्यमंत्री फडवणीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा**

**कंधार** -महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्याकरिता सामाजिक उपक्रम राबवत भारतीय जनता पार्टी कंधारच्या वतीने रक्तदान करून सामाजिकतेची जाण ठेवत रक्तदानाने अनोख्या शुभेच्छा दिल्या असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव देविदास राठोड यांनी रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्व भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांना आवाहन केले मुख्यमंत्र्याचा वाढदिवस हा बॅनर बाजी न करता सामाजिक उपक्रम राबवत रक्तदान करून करावा असे सांगितले त्या निमीत्त संबंध महाराष्ट्रभर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येक मंडळात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे ,त्याच निमित्त भारतीय जनता पार्टी कंधार उत्तर मंडळ, कंधार दक्षिण मंडळ व कंधार शहर मंडळ यांच्या वतीने दिनांक २१ जुलै रोजी महाराणा प्रताप चौक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले यावेळी ११२ रक्तदात्यांनी रक्तदान केले या रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक देविदासभाऊ राठोड यांनी उपस्थित त्यांना रक्तदान केल्याबद्दल शुभेच्छा दिल्या व या अनोख्या उपक्रमाची प्रशंशा केली.

या रक्तदान शिबिराचे आयोजन भारतीय जनता पार्टी कंधार शहर मंडळ, कंधार दक्षिण व कंधार उत्तर मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते या शिबिराचे उद्घाटन भाजप प्रदेशाच्या चिटणीस देवीदास भाऊ राठोड यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ११२ रक्तदात्यांनी रक्तदान केले या वेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस चित्रलेखाताई गोरे, राष्ट्रीय परिषद सदस्य धोंडीबा भायेगावे,दक्षिण मंडळ अध्यक्ष अड विजय धोंडगे, कंधार उत्तर मंडळाध्यक्ष बालाजीराव पांडागळे, कंधार शहराध्यक्ष अड गंगाप्रसाद यन्नावार, लोहा उत्तर मंडळ अध्यक्ष शरद पवार, माझी पंचायत समिती सदस्य डॉ सुनील धोंडगे,

माजी पंचायत समिती सदस्य उत्तम चव्हाण, पंचायत समितीचे सदस्य सत्यनारायण मानसपूरे, दत्ता करामुंगे, आनंदराव किडे, दत्तात्रेय पेठकर, व्यंकट गव्हाणे नागोराव पाटील मोरे एजाज पटेल गोविंदराव कपाळे शोकराव गोरे ,संभाजीराव घुगे ,अभिजीत इंदुरकर ,सागर डोंगरजकर, प्रवीण बनसोडे ,अरविंद वसमतकर, भारत पाटील कदम, अनिल मोरे, शरद भागानगरे ,जयराम कांबळे, सरपंच गणपत गायकवाड,अनिल फरकंडे, सुहास दिग्रसकर, संतोष कराळे यांच्या सह भाजप कार्यकर्ते पदाधिकारी यांची उपस्थिती होती. रक्त संकलन नंदिग्राम ब्लड सेंटर नांदेड यांनी केले यावेळी ब्लड सेंटरचे संपर्क अधिकारी आनंद लोणे व त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते.

**हाणेगाव येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान संकल्प**

**हाणेगाव**-हाणेगाव येथे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रीय मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त देगलुर तालुका भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष ड प्रितम देशमुख यांच्या नेतृत्वात जगात सर्वश्रेष्ट दान रक्तदान या संकल्पनेतुन महारक्तदान संकल्प आयोजीत करण्यात आला होता यावेळी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतीमेचे प्रशांत देशमुख यांच्या हस्ते पुजन करुन शिबीराची सुरुवात करण्यात आली यावेळी गावातील व परीसरातील नवतरुन व भाजपाचे कार्यत्यांनी आपलं रक्तदान केले यात प्रेम पाटील,धनाजी नाईकवाडे,प्रशांत रामपुरे,श्रयश देशमुख, आकाश देशमुख, युवराज स्वंतकर,अंगद पाटील,तुळशीराम वळगे,मनोज पाटील,इम्रान पठाण,प्रदिप स्वंतकर, महेश ध्याडे,शाम नुदनुरे असे जवळपास १०० कार्यकर्त्यांनी रक्तदान केले .

यावेळी भाजपाचे तालुका उपाध्यक्ष रमेश सावकार राणे,मरखेल पोलीस ठाण्याचे प्रमुख रविंद्र हुंडेकर ,शिवकांत अप्पा माळगे,मधुकर पाटील,यनगुंदे गुरुजी,रमाकांत फुलारी ,नांदेड ब्लड बँक सेंटरचे कर्मचारी आदीजन उपस्थित होते


## संक्षिप्त वृत्त

### गणेशवाडी तांडा येथे आढळले चिकनगुनिया सदृष्य आजाराचे ८३ रुग्ण

**हिमायतनगर, दि.२२ जुलै -**

हिमायतनगर तालुक्यातील गणेशवाडीतांडा येथे अर्धे गावच तापाने फणफणले असून, चिकनगुनीया सदृष्य आजार असल्याचे लक्षण रूग्णांना जाणवत आहेत. ताप, सर्दी, खोकला, गुढगे दुखणे अशा प्रकारच्या आजाराचे ८३ रूग्ण आढळले आहेत. चिचोर्डी प्राथमिक आरोग्य केंद्रांअंतर्गत येत असलेल्या गणेशवाडीतांडा येथे आरोग्य विभागाचे पथक तैनात करण्यात आले आहे. नागरिकांना स्वच्छ पाणी पिण्यासाठी उपलब्ध करून देण्याकरीता येत्या दोन दिवसातच फिल्टर मशिन बसवून जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली जाईल, असे आमदार कोहळीकर यांनी सांगितले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमंख विवेक देशमुख, संभाराव लांडगे, रुग्णांचे सॅम्पल लॅबला पाठविले. चिकनगुनिया आजाराचे संकेत असलेल्या रूग्णांचे सॅपल तपासणीसाठी लॅबला पाठविण्यात आल्याचे प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत देशमुख यानी सांगितले. दरम्यान, दि. २० रविवारी तालुक्याचे आ. बाबूराव कदम कोहळीकर यांनी गणेशवाडी तांडा येथे भेट दिली. यावेळी सत्यवृत्त ढोले, गंगाधर मिराशे, विष्णू काळे, डॉ. सरकुंडे, गजानन गोपेवाड, संतोष कदम, रामदास भडंगे श्याम पाटील, राम लवटे, पंडीत चौथमल, रेणुका वानोळे , अशोक गायकवाड, शेख नादर, सचिन राठोड आदिंसह गांवकरी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

### किनवट येथे विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा यशस्वी



**किनवट**-लायन्स क्लब गोल्ड किनवट आणि Ultimate Mind, हैदराबाद यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम मंदिर हॉल, किनवट येथे (दि.२०) रोजी मोफत आयोजित HOW TO DOUBLE YOUR MIND POWER ही मोफत कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली. सुप्रसिद्ध प्रशिक्षक एस. भास्कर सर यांच्या मार्गदर्शनाखाली चार सत्रांत (सकाळी १०:००, दुपारी १२:००, संध्याकाळी ४:०० व ६:००) पार पडलेल्या या कार्यशाळेत प्रत्येकी १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. लक्ष केंद्रित करणे, तणाव-भीतीवर मात, स्मरणतंत्र, गणिती सूत्रे, आवर्तसारणी आणि दीर्घ उत्तरे लक्षात ठेवण्याच्या तंत्रांचा समावेश असलेल्या या कार्यशाळेने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि प्रेरणा निर्माण केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात लायन्स क्लब गोल्ड किनवटचे अध्यक्ष श्रीधर नेम्मानिवार, उपाध्यक्ष अभय महाजन, सचिव गौरव इटकेपेल्लीवार, ट्रेझरर निशांत चाडावार, तसेच वेंकट नेम्मानिवार, सुनीलराव मामा, राजेंद्र चाडावार, डॉ. राजेंद्र जन्नावार आणि वेंकटेश कंचर्लावार यांचे मोलाचे योगदान लाभले. विद्यार्थी व पालकांनी आयोजकांचे कौतुक करत अशा कार्यशाळांची पुनरावृत्ती व्हावी, अशी मागणी केली

## निष्काळजी उपचारांनी घेतला एका जीवाचा बळी; संतप्त नातेवाईकांचा वडजे रुग्णालयास घेराव

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२२ जुलै -**

जिच्या आयुष्यात एक नवीन जीव येण्याची उमेद होती,तिथेच तिचाच श्वास अचानक थांबला! वया च्या अवघ्या विसाव्या वर्षी एका तरुण विवाहितेचा गरोदर असतानाच मृत्यू झाला आणि तिच्या कुंटुंबा वर आभाळ कोसळले. हे दुर्दैव घडले नायगांवमधील वडजे प्रसूती रुग्णालयात, जिथे तिच्यावर झालेल्या कथित चुकीच्या उपचारांमुळे तिचा जीव गेला, असा गंभीर आरोप तिच्या नातेवाईकांनी केला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या या विवाहितेची प्रकृती अचानक खालावली आणि वडजे डॉक्टरांनी तिला नांदेडला हलवण्याचा सल्ला दिला. मात्र, वेळ निघून गेलेली होती. नांदेडला नेत असतानाच तिचा मृत्यू झाला. नांदेडमधील तज्ज्ञ डॉक्टरांनी वडजे रुग्णालयातील उपचार पद्धतीवर आक्षेप घेत प्राथमिक उपचार चुकीचे होते असा निष्कर्ष दिला, असे तिच्या कुंटुंबियांनी सांगितले. या घटनेमुळे संतप्त झालेल्या शेकडो नातेवाईकांनी सोमवारी दुपारी नायगांव येथील डॉ.वडजे रुग्णालयासमोर मोठा जमाव केला. राग अनावर झाल्याने काही जण रुग्णालयात घुसले. वेळेवर पोलिस आणि गावातील सामाजिक कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचल्यामुळे मोठा अनर्थ टळला. दरम्यान, डॉ. वडजे आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी गेट बंद करून स्वतःला लपवले होते.




या रुग्णालयाविरोधात यापूर्वीही अशा घटनांची कुजबूज होती. स्थानिक नागरिकांच्या मते, याच रुग्णालयात मागील काही महिन्यांत सात ते आठ महिलांचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेल्यांमध्ये देगांव येथील तीन महिला असल्याची माहिती समोर येत आहे. आरोप आहे की, प्रत्येक वेळी प्रकरण आर्थिक व्यवहार करून मिटवले जाते आणि त्यामुळेच येथील वडजे रुग्णालय व प्रशासना ची सातत्याने बेपर्वाई वाढतच चालली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी व्हावी,आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी संतप्त मागणी यावेळी नातेवाईकांसह स्थानिक नागरिकांनी केली आहे. महिलांच्याजीवाशी खेळणाऱ्या वडजे रुग्णालयाची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.

## दिव्यांग वैभव पईतवारची महसूल सहाय्यक पदी निवड

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२२ जुलै -**



सिडको येथील गरीब कुटुंबातील रहिवासी वैभव शिवकुमार पईतवार याने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग परीक्षा (एमपीएससी) उत्तीर्ण होऊन महसूल सहाय्यक म्हणून मुंबई येथे त्यांची निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा मार्फत राज्य सरकार हे विविध सरकारी पदांची भरती करत असते म्हणून हेच ध्येय मनाशी धरून वैभव शिवकुमार पईतवार हा एक गरीब कुटुंबातील विद्यार्थी त्याने इयत्ता दहावी वर्गात शिकत असताना वयाच्या सोळाव्या वर्षी त्याला विजेचा शॉक लागून त्याचे दोन्ही हात गमावून बसला. त्यानंतर त्याने खचून न जाता पुढील शिक्षण चालू ठेवत समाजकार्य शिक्षण (एमएसडब्ल्यू) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे घेऊन. यापुढेही त्यांनी आपली जीवन जगणे कठीण असल्याचे डोक्यात घेऊन जळगाव येथील मनोबल दीपस्तंभ अकॅडमीत अभ्यास करून एमपीएससी परीक्षा पास झाल्याने त्यांची महसूल सहाय्यक पदी निवड झाल्यामुळे दिव्यांग वैभव पईतवार याचे कौतुक होत आहे.

## सरसम येथील दलित वस्तीत असुविधा

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.२२ जुलै -**

हिमायतनगर तालुक्यातील मौजे सरसम बुद्रुक या गावातील वार्ड क्रं १ मधील जिल्हा परिषद शाळेच्या मागील दलित वस्ती ही गेल्या पाच वर्षांपासून या दलित वस्तीत ना रस्ते आहेत, ना नालेसफाई, पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. गेल्या ८ महिन्यापेक्षा जास्त कालावधीउलटून गेला पण अजूनही पाणी पुरवठा सुरळीत होत. नाही. फक्त नावाला टाकी अन टाकी ठेवण्यासाठी स्टॅन्ड आणून ठेवण्यात आला आहे. पाणी मात्र अजूनही त्या टाकीला येत नाही. या दलित वस्तीसाठी मंजूर झालेले रस्ते ग्रामपंचायत चे सदस्यच पळवापळवी करून आपापल्या वार्डात कसे नेता येतील याची स्पर्धा करत आहेत. यामुळे या दलित वस्तीत आलेला रस्ता मात्र गेल्या ६ महिन्यापासून प्रलंबित आहे.

## प्रदेशाध्यक्ष विजय घाडगे यांना मारहाण करणाऱ्यांना तात्काळ अटक करा : छावा

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि.२२ जुलै -**

छावा सामाजिक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शिवश्री विजय घाडगे यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी काही गुंडासह लातुर येथे अमानुष हल्ला केला. या हल्ल्याबाबत छावा संघटनेच्या वतीने तिव्र निदर्शने करत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या राजकारणाचा तिव्र शब्दांत निषेध करण्यात आला.

या हल्ल्यामध्ये छावा संघटनेच्या जबाबदार पदाधिकाऱ्यांना लक्ष्य केले गेले असून, हि घटना लोकशाहीविरोधी व कायदा व सुव्यवस्थेला आव्हान देणारी आहे. राज्याचे कृषि मंत्री कोकाटे यांनी सरकारमध्ये राहुन शेतकऱ्यांना न्याय देण्याची भुमिका असताना राज्याच्या पवित्र सभागृहात मोबाईलवर जंगली रम्मीचे पत्ते खेळत बसले ही बाब लोकशाहीला काळीमा फासणारी आहे. कृषी मंत्री हे शेतकऱ्यांची अनेकवेळा जाणुन बुजुन खिल्ली उडविण्याची एकही संधी सोडत नाहित. छावा संघटनेच्या वतीने लोकशाहीच्या मार्गाने विजय घाडगे यांनी राष्ट्रवादीचे सुनील तटकरे यांना लेखी निवेदन दिल्याचा राग धरून गुंडगिरी पध्दतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष्यांच्या कार्येकर्त्यानी बेदम मारहाण केली आहे.



गुंड प्रवृत्तीच्या सुरज चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांना त्यांच्या गुन्हेगाराविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा व सदरिल हल्ल्याची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करुन गंभीर गुन्हा दाखल गुन्हा दाखल करण्यात यावा, सुरज चव्हाणसह त्यांच्या सहकाऱ्यांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षातून बडतर्फ करण्यात यावे, कृषि मंत्री माणिक कोकाटे यांची मंत्रीमंडळातुन हाकलपट्टी करण्यात यावी अन्यथा सकल मराठा समाजाच्या वतीने राज्यभर तिव्र आंदोलनाचा इशाऱ्यांचे निवेदन मुखेडचे तहसीलदार राजेश जाधव यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे देण्यात आला आहे.

यावेळी शिवसेनेचे भालचंद्र नाईक,संभाजी ब्रिगेडचे प्रदीप पा. हसनाळकर,शिवसेना तालुका प्रमुख उमेश पा. आलूरकर, छावाचे तालुकाध्यक्ष गिरीधर पा.केरूरकर, राजमुद्राचे सचिन पा. इंगोले, शिवसेना शिंदे गटाचे बालाजी पा. ढोसणे, युवक काँग्रेसचे तुकाराम पा. सुडके, शिवसेना शहर प्रमुख शंकर चिंतमवाड, सदाशिव पा. गोजेगावकर,सूर्याजी पा. शिंदे, काँग्रेसचे युवा नेतृत्व अविनाश पा.इंगळे, बजरंग पा. जिगळे,आनंद पाटील,माधव पाटील,बालाजी पा.बोडके, गोविंद पा.टेकाळे, बालाजी पा.शिंदे,धम्मानंद जोंधळे मोटरगेकर, कपिल काठेवाड, दामोदर गाढवे, श्रीकांत शिंदे, आनंद खंडागळे, संतोष पा.इंगोले यांच्यासह सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.